

# कायद्याची ओळख



श्रम कायदा - 1



श्रम कायदा - 2



सामाजिक आर्थिक अधिकार

# आभार

विधी व न्याय विभाग, मंत्रालय भारत सरकार व यु.एन.डी.पी. यांनी 'कानुन को जाने' हया हिंदी भाषेत प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तकाचे, मराठी भाषेत रुपांतर करुन प्रकाशित करण्याची परवानगी दिलेली आहे. (पत्र क्र. डी.ओ.क्र. AZJ/IEC diseem/01/12 दिनांक १३/०४/२०१२) हयाबद्दल महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई विधी व न्याय मंत्रालय (न्याय विभाग) भारत सरकार व यु.एन.डी.पी. यांचे आभार मानीत आहे. तसेच, सदर पुस्तकातील कायदेविषयक माहिती सोप्या भाषेत, तळागाळातील लोकांना समजेल अशा उदाहरणासहीत लिहिलेली आहे ते माननीय लेखक महोदय श्री. संतोष कौशिक, श्री. संजय सिंह राठौर, श्री. विश्वास चव्हाण यांचे महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण शतशः ऋणी आहे. त्याचप्रमाणे सदर पुस्तक प्रकाशित करण्याकरीता ज्या ज्या लोकांचा सहभाग मिळाला त्या सर्वांचे महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे आभार प्रदर्शित करीत आहोत.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

---

विधी व न्याय विभाग, भारत सरकार तसेच यु.एन.डी.पी. यांच्या सहयोगाने न्याय हे तळागाळातील लोकांकरीता (Access to Justice for marginalised people) या योजनेच्या अंतर्गत लोकांमध्ये कायदेविषयक साक्षरता निर्माण करणेकरीता विविध कायदेविषयक माहिती असलेली पुस्तकें विधी व न्याय विभाग, भारत सरकार व यु.एन.डी.पी. यांनी हिंदी भाषेत प्रकाशित केली. सदर पूस्तकांचा मराठीत अनुवाद विधी व न्याय विभाग – (पत्र क्र. D.O. No. AZJ/IES diseem/01/12 दि. १३ एप्रिल २०१२) यांच्या परवानगीने महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

या पूस्तकाचा मुख्य उद्देश जनतेकरीता कायद्यात असलेल्या तरतूदींविषयी माहिती सोप्या मराठी भाषेत देऊन त्यांना विधी साक्षर करणे असा आहे, त्यामुळे या पुस्तकात समाविष्ट कायद्याबाबत माहितीच्या मजकूराच्या आधारे कायदेशीर प्रकरणासाठी उपयोग करणे अपेक्षित नाही. त्यासाठी मुळ शासकीय अधिनियमांचा व कायद्याच्या पुस्तकाचा उपयोग करावा तसेच या पूस्तकात दिलेली उदाहरणे किंवा गोष्टी या संपूर्णता काल्पनिक आहेत, त्यांचा कुठल्याही व्यक्तीशी अथवा घटनेशी संबंध नाही.

# अनुक्रमणिका


- श्रम कायदा – १ १
  - — गोष्ट : घामाचे महत्व २
  - — कामगार नुकसान भरपाई अधिनियम १९२३ ५
  - — अंतर राज्यिक प्रवासी कामगार कायदा १९७९ ९
  - — कंत्राटी कामगार १३
  - — बंधित कामगार १६

- श्रम कायदा – २ २१
  - — अधिकार २२
  - — किमान मजुरी कायदा २३
  - — गृह/बांधकाम व्यवसायातील श्रमिकांचे अधिकार २९
  - — मानव तस्करी ३३
  - — कर्मचारी राज्य विमा अधिनियम १९४८ ३५

- सामाजिक आर्थिक अधिकार ३९
  - — कथा : माहितीचा हक्क ४०
  - — माहितीचा अधिकार २००५ ४१
  - — राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी कायदा २००५ ४८
  - — ग्राहक संरक्षक अधिनियम १९८६ ५२
  - — मोटार वाहन नुकसान भरवाई अधिनियम १९३९ ५६
  - — नरेगाच्या तक्रारीचे निराकरण ६१

# श्रम कायदा – १

# १. गोष्ट : घामाचे महत्व

रमेश एका कपडयाच्या मिलमध्ये लूम चालवायचे काम करत होता. त्याला गणेश नावाचा एक मुलगा होता. तो १०वी इयत्तेत शिकत होता.

एके दिवशी रमेश कामावरुन घरी पोहचला तेव्हा त्याचा मुलगा गणेश आपल्या सर्व मित्र मंडळी सोबत घरात कोणत्यातरी चर्चेत मग्न होता.



गणेश म्हणाला "घ्या बाबा आले त्यांचीच मदत घेऊया."

रमेशला काही समजले नाही. त्याने विचारले "कसली मदत?" काय गोष्ट आहे? काही गंभीर विषयावर चर्चा होते आहे का?.

सगळे हसले.

गणेश म्हणाला, "बाबा शाळेत वार्षिक उत्सव होत आहे आम्ही सगळे एक नाटक करणार आहोत. काही तरी विषय सांगा ना! नाटक आम्ही लिहुन घेवु."

रमेश हसला, आपल्या विदयार्थी जीवनात तो पण नाटकात भाग घेत होता. रमेश म्हणाला "जेव्हा आम्ही शिकत होतो तेव्हा आम्ही पण खुप नाटके केली परंतु एक नाटक मी केव्हाच विसरु शकत नाही.

गणेशने विचारले, "काय नाव होत त्या नाटकाच?"

"घामाचे महत्व", रमेश म्हणाला

सगळी मुले म्हणाली, "त्याची गोष्ट सांगा आम्ही नाटक लिहून घेऊ!"

रमेशने सांगायला सुरुवात केली.

एक राजाची राणी आजारी पडली. राजवैद्याला दाखविले. काही उपयोग झाला नाही. दूर देशाच्या वैद्याला बोलावले तरीही काही उपयोग झाला नाही. मांत्रिक तांत्रिकांना बोलवले तरी काही झाले नाही. राणीची तब्बेत बिघडतच होती.

राजाने पुरस्काराची घोषणा केली की, जो कोणी राणीचा उपचार करुन देईल त्याला मागेल ते बक्षिस दिले जाईल.



पुरस्काराची बातमी जवळपासच्या सर्व राज्यांमध्ये पसरायला लागली.

राजाची निराशा वाढतच होती.

दिवसा मागून दिवस महिन्यांमागून महिने जात होते राणी मरणासन्न झाली. तेव्हा एका दुर देशातून एक वैद्य आला. त्याने राजमहालाच्या द्वारपालाला सांगितले, "मी राजाला भेटू इच्छितो."

द्वारपालाने विचारले, "कशासाठी?"

वैद्य म्हणाला, "राजाना जावून सांगा की मी राणीचा उपचार करु शकतो."

"थोडा वेळ थांबा" असे सांगून द्वारपाल राजाकडे पळत गेला.

थोडा वेळाने राजा स्वत: वैद्याला घ्यायला आला.

वैद्याने राजमहलामध्ये जाऊन राणीला तपासले व म्हणाला, "राणी चांगली होईल महाराज आणि माझा एक पुडीमध्येच होईल."

राजा आनंदाने म्हणाला, "लगेच औषध द्या वैद्यजी!"

वैद्याने लगेच पिशवीतुन एक पुडी काढली आणि म्हणाला, "ही घ्या एकच पुडी आहे. हिला दोन थेंब घामात मिसळून द्या. देवाने ठरविले तर एक पुडीच काम करुन जाईल."

राजाने जवळ असलेल्या मंत्र्याला सांगितले, "वैद्यराजला आपल्या अतिथीगृहामध्ये घेऊन जा. पुर्ण सन्मानाने यांच्या राहण्याची व्यवस्था करा. महाराणी ठिक होईपर्यंत हे आमचे राजकीय अतिथी राहतील. औषधाने काम केले तर यांना खुप मोठ्या पुरस्काराने सन्मानित केले जाईल."

वैद्यराज राजाला नमस्कार करुन मंत्र्यासोबत अतिथीगृहात गेले.

दुसऱ्या दिवशी राजाने आपल्या मंत्रीमंडळाची बैठक घेवून महामंत्रीला सांगितले महामंत्री तुम्हाला माहित आहे ना महाराणीची तब्बेत ठिक नाही. वैद्यराजाचे औषध दोन थेंब घामात मिसळून द्यायची आहे. दोन थेंब घाम आहे का तुमच्या जवळ?

महामंत्री अडखळत म्हणाले, "महाराज माझ्या जवळ तर नाही आहे हा पण मी खुप लवकर घामाच्या थेंबाची व्यवस्था करुन देतो, मला काही वेळ द्या."

राजाचा राग अनावर झाला आणि तो म्हणाला, "जर सात दिवसाच्या आत दोन थेंब घामाचे नाही आणले तर लक्षात ठेवा, मी तुम्हाला फासावर चढविल."

महामंत्रीने लगेच आपल्या चार दूतांना बोलविले आणि सांगितले, "तुम्ही चारही जण चार दिशांना जा, एक उत्तर एक दक्षिण एक पुर्व आणि एक पश्चिम. पाच दिवसात जेथे मिळेल तेथून घामाचे दोन थेंब घेऊन या लगेच जा आणि लक्षात ठेवा जर तुम्ही घामाचे दोन थेंब नाही आणले, तर मी फाशीवर नंतर चढेन पण तुम्हाला चारहींना जणांना आधी फाशीवर चढवीन.

चारही दूत चार दिशांना गेले.

दूत भटकत होते पण त्यांना घामाचे दोन थेंब मिळाले नाही. घाम न मिळण्याचे मुख्य कारण हे होते की राजाच्या राज्यात सगळे विलासामध्ये बुडाले होते व सगळे श्रीमंत होते.

राज्यात कोणीच मेहनत करीत नव्हते सगळे कामचोर व आळशी होते.

घामाच्या तपासात भटकत–भटकत चारही दूतांचे चारही दिवस गेले. निराश होऊन सगळे परतीला निघाले तेव्हा एक नगर शेठ आपल्या डोक्यावर एक गाठोडे घेऊन



जात होता.

एका दुताने विचारले तुझ्या डोक्यावर काय आहे शेठ?

शेठ म्हणाला, माझ्या घाम–कष्टाची कमाई आहे. चारही दूत आनंदी झाले आणि चौघेही एकदम म्हणाले, "यांच्या जवळ आहे घाम."

शेठला पकडून ते राजमहल मध्ये महामंत्री जवळ घेवुन गेले. एक दूत म्हणाला, "महाराज याच्याजवळ आहे घाम."

महामंत्री आनंदीत होवून म्हणाला, "याला महाराजांकडे घेवून चला."

महामंत्री लगेच शेठला घेवुन राजाजवळ गेला व म्हणाला, "महाराज, याच्याजवळ घाम आहे."

राजा म्हणाला, "काय शेठ, या गठरी मध्ये काय आहे?"

शेठ घाबरत घाबरत म्हणाला, "माझ्या घाम–कष्टाची कमाई."

"गठोडे उघडून दाखव", राजा म्हणाला.

शेठने गठोडे खोलून दाखवले तर राजा आश्चर्यचकीत झाला त्यात राणीचे दागिने होते जे काही दिवसापुर्वी चोरी गेले होते.

राजा क्रोधीत होवून म्हणाला, "हे तर चोरीचे दागिने आहेत."

"मला माहित नाही महाराज मला तर एका व्यक्तीने विकले होते." शेठ म्हणाला.



राजा क्रोधीत होवून तळमळत म्हणाला, "संपूर्ण राज्यात दोन थेंब घामाचे मिळत नाहीत. फाशीचा दोरखंड आणा." दरबाराच्या मधोमध फाशीचा दोरखंड ठेवला.

सर्व दरबारी उभे राहून घाबरत घाबरत राजाकडे पाहत होते राजाने महामंत्रीला विचारले, "सांगा फासीवर कोणाला चढवू?" महामंत्री म्हणाला, "महाराज मला चढवून द्या, मी घामाचे दोन थेंब आणु शकलो नाही."

शेठ म्हणाला, "फाशीवर मला चढवून द्या महाराज मी चोरीचे दागिने खरीदी केले."

राजान डोळे बंद करुन ओरडून म्हणाला, "फाशीवर मीच चढेन."

दरबारात हाहाकार माजला

राजगुरु म्हणाले, "तुम्ही का राजे तुम्ही काय आपराध केला आहे."

राजा म्हणाला, "ज्या राजाच्या राज्यात लोक श्रम करायचे विसरले, आळशी, विलासी आणि कामचूकार झाले त्या राजाला जगायचा काहीच अधिकार नाही."

सर्व दरबारी गोंधळ करु लागले.

महामंत्री म्हणाला, "थांबा महाराज, मला दरबारामधील लोकांना काही विचारायचे आहे. " राजाने मान हालविली.

महामंत्रीने विचारले, "आपल्या सगळ्यांच्या सहयोगाने राजकाम चालते, आपले महाराज फाशीवर जायचे म्हणतात काय मत आहे आपले?"

सर्व दरबारी हाथ जोडून राजाची क्षमा मागत बोलले, "महाराज, आम्हाला माफ करा आपण आपला निर्णय बदलुन टाका आम्ही शपथ घेतो की आम्ही आजपासूनच कामाला लागू. पुर्ण राज्याच्या लोकांना पण काम करण्यास प्रेरित करु कष्टाची भाकरी खाऊ."

राज्याच्या चेहऱ्यावर हसू आले.

राज्याचे सर्व लोक कष्ट करु लागले घाम गाळू लागले.

रानीला घामाच्या थेंबात मिळवून औषध दिले राणी स्वस्थ झाली.

देशाचे प्रसिध्द नाटककार विजय तेंडुलकर यांची गोष्ट समाजापुढे मोठे प्रश्न उभे करते. खरं सांगायच तर आपल्या हिस्याचे श्रम केल्या शिवाय आम्हाला धरतीवरचा अन्नचा एक दाना पण खाण्याचा अधिकार नाही.

सर्व लोकांनी कष्ट करावे आणि कष्टाचे पुर्ण फळ पण घ्यावे.

कष्टाचे पुर्ण फळ मिळावे यासाठी 'श्रम कायदे' पण बनविले आहे जे श्रमाचे योग्य उपयोग करुन कामगारांच्या अधिकारांचे रक्षण करतात.

## २. कामगार नुकसान भरपाई अधिनियम १९२३

- राजेंद्र हा एका कापड गिरणीत काम करत होता. काम करतांना त्याचा डावा हात मशीनमध्ये आल्याने तो जखमी झाला. त्याला ताबडतोब दवाखाण्यात नेण्यातआले. काही महिन्यांनी जखम बरी झाली पण त्या हाताने तो काम करु शकत नव्हता.
- राहूलचे वडील धनबादच्या एका कोळश्याच्या खाणीमध्ये काम करत होते. कोळसा खाण ढासळल्याने त्यांचा मृत्यू झाला.
- मनोज अहमदाबादच्या एका प्रोसेस हाऊस मध्ये काम करत होता. कपड्यांना रंग देतांना त्याच्या एका डोळयात कास्टिक सोडा पडल्याने डोळयांची दृष्टी गेली.



अशा प्रकारच्या अनेक घटना पुन्हा–पुन्हा घडत राहतात अशा घटनांमध्ये दुर्घटनांच्या व्यक्तिंना नुकसान भरपाई मिळण्यासाठी कामगार नुकसान भरपाई अधिनियम १९२३ चा वापर करण्यात येतो.

कामगार नुकसान भरपाई अधिनियम १९२३, कलम ३

नुसार कामगाराला काम करतांना किंवा काम करण्याच्या वेळी काही इजा झाली तर मालकाची नुकसान भरपाईची जबाबदारी असेल.

या कायद्यात काय आहे.

प्रश्न : कुठल्याही कामगाराला इजा किंवा आजार झाल्याने त्याचा मृत्यु झाला तर नुकसान भरपाई कशी होईल?

उत्तर : वारसदारांना नुकसान भरपाई मिळेल.

प्रश्न : वारसदारांमध्ये कोण कोण येतात.

उत्तर : १. कामगाराची विधवा

२ अज्ञान मुलं

२ अविवाहित मुली

३ विधवा आई

४ अपंग मुलगा/मुलगी

५ मृत कामगाराच्या कमाईवर अवलंबून खालील वारसदारांना नुकसान भरपाई मिळेल.



- वडिल
- अज्ञान मुले
- अनौरस मुले
- विधवा सुना
- मृत मुलाचे अज्ञान मुल
- विधवा अज्ञान बहिण
- अविवाहित बहिण
- मृत व्यक्तीचे आई वडिल नसल्यास आजी—आजोबा

नुकसान भरपाईसाठी क्षेत्राचा कामगार अधिकारी, कामगार निरिक्षक इ. कडून कामगारांचे काम कुठल्या श्रेणीत मोडते आणि त्याला नुकसान भरपाईसाठी काय करावे लागेल याबाबत मार्गदर्शन दिले जाते.

प्रश्न : कोणकोणत्या प्रकारचे काम करताना इजा झाल्यास नुकसान भरपाई मिळू शकते?

उत्तर : १ लिफ्ट किंवा कुठलेही वाहनावर सामान चढवणे किंवा उतरवणे किंवा देखरेखीचे काम

२ रेल्वे, टपाल खाते किंवा कारखान्याचे काम

३ इमारत, बांध, रस्ता, पुल, भुयार इ. बनवण्यासाठी किंवा पाडण्यासाठी किंवा लक्ष्य देण्यासाठीचे काम

४ ट्युब वैल ची देखरेख व सुधारण्याचे काम

५ वीजेच्या देखरेखीचे काम

६ ट्रॅक्टर किंवा अन्य यंत्रांचे उपयोग करुन शेतीचे काम

७  कोणत्याही वस्तुला बनविणे, बदलविणे, सुधरविणे, सजविण्यासाठी अशी जागा जिथे २० लोकांपेक्षा जास्त लोक काम करतात.

तुम्ही जे काम करत आहात ते या कायद्यात बसते की नाही याबाबतची माहिती आपणास जवळच्या विधी सहायता केंद्रात मिळू शकते.



प्रश्न : कोणत्या स्वरुपाच्या दुखापतीकरिता नुकसानभरपाई दिली जाते.

उत्तर : शरीर कापणे, डोळयांची दृष्टी जाणे, प्राणघातक अपघात व गंभीर शारीरीक दुखापत झाली असेल किंवा कमवण्याची क्षमता गमावली गेल्यास नुकसान भरपाई मिळू शकते.

प्रश्न : कारखान्याच्या बाहेर झालेल्या दुर्घटनेत नुकसान भरपाई मिळू शकते का?

उत्तर : हो, पिडीत व्यक्ति जर कामावर असताना दुर्घटना झाली तर.
उदा.: एक मुलगा गोदामामध्ये चहा देण्याचे काम करत होता. गोदामामध्ये काम करणारे लोकांसाठी चहा घऊन जात होता. गोदामाच्या बाहेर खूप गर्दी होती त्याच्यावर नियंत्रण करण्यासाठी पोलीसांना गोळीबार करावा लागला, तेव्हा चहा देणाऱ्या मुलाला गोळी लागली आणि त्याचा मृत्यू झाला मालकाची चूकी नसतांनाही त्या मूलाच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई द्यावी लागली.

प्रश्न : खुप ठिकाणी कामगारांना काम कंत्राटदारांकडून दिले जाते. अशा कंत्राटी कामगारांना मालकाकडून नुकसान भरपाई मिळेल का?

उत्तर : हो, कंत्राटावर काम करणाऱ्या कामगारांना देखील मालकाकडून या कायद्याच्या अंतर्गत नुकसान भरपाई मिळेल.

प्रश्न : कोणत्या परिस्थितीमध्ये नुकसान भरपाई मिळू शकत नाही?

उत्तर :
१  दुखापत झाल्याने ३ दिवस किंवा त्याच्यापेक्षा कमी दिवस काम करण्यास असमर्थ होत असेल.
२  जर दुर्घटना दारुचे सेवन केल्याने झाली असेल
३  कामगाराच्या हलगर्जीपणामुळे दुखापत झाली असेल तर
४  दुर्घटना कामावर झाली नसेल

प्रश्न : दुखापत झाल्यावर किती नुकसान भरपाई मिळते?

उत्तर :
१  नुकसान भरपाई किती मिळेल हे झालेल्या दुखापतीवर निर्धारित असते. जर दुखापत गंभीर स्वरुपाची असेल तर जास्त नुकसान भरपाई मिळेल.
२  दुखापत झाली तेव्हा तो कामगार किती कमवतो त्याच्यावर किती रक्कम द्यावी हे अवलंबून असते.

३ जर कामगाराचे वय कमी असेल तर जास्त नुकसान भरपाई मिळते

४ नोकरी सोडल्यापासुन दोन वर्षात कामगार आजारी पडला तरी नुकसान भरपाईची जबाबदारी मालकाची राहील. आजार – कॅन्सर, टि.बी., दमा, मोतीबिंदु, बहिरेपणा इ.

प्रश्न : नुकसान भरपाई मिळण्यासाठी काय करावे लागेल?

उत्तर : १ दुखापत झाल्याबरोबर मालकाला नोटीस द्यावी लागेल

२ नोटीस मध्ये नाव, अपघात झाल्याचे कारण, कुठल्या तारखेला झाला याचा उल्लेख पाहिजे

३ कमिशनर (आयुक्तांना) एक अर्ज द्यावा लागेल

४ अर्ज हे दुखापत किंवा अपघात झाल्याच्या दोन वर्षाच्या आत दिला पाहिजे

प्रश्न : काम करतांना महिला कामगारांना दुखापत झाली किंवा मृत्यु झाला तर नुकसान भरपाई कशी मिळेल?

उत्तर : १. जर एखाद्या महिला कामगाराला दुखापत झाली असेल तर तिला नुकसान भरपाई एकत्रित दिली जात असेल तर ती रक्कम आयुक्ता मार्फत कामगारास दिली जाते.

२ जर कामगारास मृत्यु आला तर मृताच्या नातेवाईकांना मालक परस्पर नुकसान भरपाईची रक्कम देणार नाही. मालक आयुक्तांकडे ती रक्कम जमा करेल व आयुक्त मृताच्या नातेवाईकांना नुकसान भरपाईची रक्कम देईल.

प्रश्न : बरेच वेळा मालक कामगारांकडून लिहून घेतात की, काही दुर्घटना झाली तर त्यास मालक जबाबदार नाही, अशा वेळेस मृत व्यक्तीच्या वारसांना न्याय मिळेल का?

उत्तर : हो, जरुर असा लिहून घेतलेला करार कायदेशीर मान्य नाही.

<u>अपघात झाला तर काही गोष्टी लक्षात ठेवा –</u>

१ वैद्यकीय तपास करुन घ्या, शक्य झाल्यास शासकीय शल्य चिकित्सकाकडून करुन घ्या. डॉक्टरांकडून रिपोर्टची प्रत घ्या.

२ जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद नोंदवा आणि त्याची पोच घ्या.


३ जर पोलीस स्टेशनला जाणे शक्य नसेल तर दुसऱ्या व्यक्तीस पाठवा व फिर्याद अवश्य नोंदवा.

४ नुकसान भरपाईसाठी वैद्यकीय रिपोर्ट व पुरावे खुप गरजेचे आहेत. जर मृत्यू झाला असेल तर कमीत कमी रु. १,२०,०००, कायमचे अपंगत्व किंवा गंभीर शारीरीक दुखापत झाली असेल तर कमीत कमी १,४०,००० मिळू शकतात.

# ३. आंतर राज्यिक प्रवासी कामगार कायदा १९७९

बऱ्याचदा असे दिसून येते की, ज्या लोकांकडे आपली स्वत:ची उपजिविका चालविण्याकरीता कुठलेही साधन उपलब्ध नसते तेव्हा त्या लोकांना मजुरीवर निर्भर राहावं लागतं. गावात काम नसल्यामुळे त्यांना काम शोधण्याकरिता गाव सोडावे लागते, कधी या गावी तर कधी त्या गावी, कधी या राज्यात तर कधी त्या राज्यात.

कामाच्या शोधात दुसऱ्या राज्यात जाणाऱ्या लोकांना 'प्रवासी कामगार' म्हणतात.अशा लोकांच्या अधिकारांच्या सुरक्षेकरीता सरकारने एक कायदा बनविला आहे ज्याला "आंतरराज्यिक प्रवासी कामगार कायदा १९७९" असे म्हणतात.



पीक काढणीच्या वेळेला तर बऱ्याचदा दुसऱ्या राज्याचे ठेकेदार काम करण्यासाठी आपल्या राज्याच्या बाहेरचे कामगार आणून त्यांची भरती करुन घेतात आणि असे निदर्शनास आले आहे की, दुसऱ्या राज्यातून आलेल्या कामगारांचे बऱ्याचदा शोषण देखील केले जाते.

त्यांना मजुरी देखील कमी मिळते, ज्या इतर सुविधा त्यांना मिळायला हव्यात त्या दिल्या जात नाहीत. खरेतर या सर्व परिस्थितीशी निपटण्याकरिता सरकारने नियम कायदे बनविले आहेत पण, लिहिता वाचता येत नसल्यामुळे आणि जागरुक नसल्यामुळे कामगार त्यांच्या अधिकारापासून वंचित राहतात.

तर प्रवासी कामगारांकरिता बनविलेले कायदे जाणून घेऊया.

प्रश्न : दुसऱ्या राज्यातून आलेला ठेकेदार जर कामगारांना कामावर घेवून जाण्यास तयार असेल तर त्या ठेकेदाराला भेटून त्या कामावर जावे का?

उत्तर : हो, जावे, पण तत्पुर्वी तो ठेकेदार खरा ठेकेदार आहे किंवा नाही याची शहानिशा करुन घ्यावी.

प्रश्न : याची माहिती कशी मिळू शकेल?

उत्तर : जो पण ठेकेदार दुसऱ्या प्रदेशातुन ५ पेक्षा जास्त कामगारांना भरती करुन घेवून जावू इच्छितो त्या ठेकेदाराजवळ त्या प्रदेशाच्या सरकारने दिलेला परवाना असायला हवा, ज्यामध्ये वैधतेची तारीख आणि कामगारांच्या भरतीची संख्या सुध्दा लिहीलेली असावी.

उदा : पंजाबचा कोणी ठेकेदार उत्तरप्रदेशच्या कामगारांना आपल्याकडे कामासाठी घेऊन जाणार असेल तर त्याच्या कडे पंजाब सरकारने दिलेला परवाना असावा.

प्रश्न : ठेकेदारासोबत जाण्याकरिता कामगारालाही काही कागदपत्र किंवा करार पत्र मिळते का?

उत्तर : हो, ठेकेदार एक पासबुक देतो, ज्यामध्ये खालील बाबी असणे आवश्यक आहे.

- फोटो
- नाव
- कामाची जागा
- कुठल्या तारखेपर्यंत काम आहे, ती तारीख
- मजूरीचा दर
- मजुरी देण्याची तारीख
- पूर्नवसन भत्ता (विस्थापन भत्ता)
- परतीच्या भाडयाचे दर
- कपात (जर केली असेल तर)आणि आगाऊ (आग्रीम राशि/एडवांस) रक्कम (जर घेतली असेल तर)
- भरतीची तारीख आणि काम सुरु करण्याची तारीख
- हजेरी आणि कामाची माहिती (स्वरुप)
- जवळच्या नातेवाईकाचे नाव आणि पत्ता

प्रश्न:— पूनर्वसन भत्ता काय आहे?

उत्तर : आपला स्वत:चा प्रदेश सोडून दुसऱ्या प्रदेशात कामाकरिता जाणाऱ्या कामागारांना दुसऱ्या राज्यात जाण्याकरिता पैसे दिले जातात ज्याला विस्थापन भत्ता (पूर्नवसन भत्ता) असे म्हणतात.

प्रश्न : हा भत्ता किती दिला जातो?

उत्तर : एका महिन्याच्या मजूरीच्या आर्धी रक्कम इतका हा भत्ता दिला जातो.

प्रश्न : येण्या—जाण्याचे भाडे ठेकेदार देणार का?

उत्तर : हो

प्रश्न : जर काही दिवसात कामावरुन काढून टाकले तर किती पैसे परत करावे लागतील?

उत्तर : नाही, जर ठेकेदार ठरविलेल्या वेळेच्या आधी कामावरुन काढत असेल किंवा सुटटी देत असेल तरीही कामगाराला विस्थापन/पुनर्वसन भत्ता आणि परतीच्या टिकीटाचे पैसे परत करण्याची गरज नाही.

प्रश्न : पासबुक मध्ये जवळच्या नातेवाईकचे नाव व पत्ता असणे का आवश्यक आहे?

उत्तर : काम करतांना बऱ्याचदा गंभीर दुर्घटना होतात ज्यामध्ये कधीकधी कामगार गंभीररित्या जखमी होवू शकतो किंवा कधी—कधी त्याचा मृत्यूही होतो अशावेळेस ही ठेकेदाराची जबाबदारी आहे की त्याने लवकरात लवकर त्या कामगाराच्या जवळच्या नातेवाईकास आणि सरकारला त्या घटनेबाबत तार करुन कळवावे, जर दुर्घटनेत कामगाराचा मृत्यु झाला असेल तर त्याच्या नातेवाईकास कायदयाप्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम दिली जाईल.

प्रश्न : प्रत्येक राज्याची किमान मजुरी एक समान आहे काय?

उत्तर : नाही, प्रत्येक राज्याची (प्रदेशाची) किमान मजुरीही राज्य शासन ठरविते आणि ती प्रत्येक राज्यानुरूप वेगवेगळी असते परंतु महिला आणि पुरुष दोघांनाही समान मजुरी दिली जाते.

प्रश्न : मिळणाऱ्या मजुरीतुन कुठली कपात केली जाते का?

उत्तर : नाही, प्रत्येक महिन्यामध्ये कमीतकमी एकदा मजुरीची रोख रक्कम दिली जाते. मजुरी घेतांना कामगार ज्या व्यक्तीकरीता काम करतोय ती व्यक्ती तिथे हजर असणे गरजेचे आहे. सोबतच मालक हे सुध्दा लिहुन देणार की, मजुरी ही त्याच्या समोरच दिली गेलेली आहे. मिळालेल्या मजुरीत सरकार मान्य किंवा सरकार द्वारे केलेली कपातच होवू शकते. बाकी कुठलीही कपात होवू शकत नाही.

प्रश्न : जर कोणी आपल्या गावातुन दुसऱ्या प्रदेशात काम करण्याकरिता जात असेल तर त्याला लागणाऱ्या वेळेच्या देखील मोबदला मिळेल का?

उत्तर : हो मिळेल

प्रश्न : जर थंड प्रदेशात मजुरी करण्यास जायचे असेल तर काय ठेकेदार, थंडी पासून बचाव घेण्याकरीता गरम कपड्यांची व्यवस्था करतो का?

उत्तर : हो

प्रश्न : दुसऱ्या प्रदेशात घर–गृहस्थिची साधने आणि जीवनावश्यक सुविधा मिळतात का आणि त्या कोणत्या?

उत्तर:–

- घर
- वैद्यकीय सुविधा
- दवाखाण्यात भर्ती झाल्यास, औषधे, खाणे–पिणे आणि येण्या–जाण्याचा खर्च
- पिण्याचे पाणी, कपडे धुण्याची सुविधा
- शौचालय
- भोजनालय (कॅन्टीन)
- २० पेक्षा जास्त महिला जर तीन महीन्यापेक्षा जास्त काम करत असतील तर त्यांच्या लहान मुलांकरीता बालवाडीची सुविधा.



प्रश्न : या सर्व सुविधा मिळतीलच याची खात्री असते?

उत्तर : जर एखादी संस्था किंवा व्यक्ती दुसऱ्या प्रदेशातुन येणाऱ्या ५ किंवा त्यापेक्षा अधिक मजुरांकडून काम घेत असेल तर सरकार त्यांचे पंजीकरण करते आणि ठेकेदारास एक परवानादेखिल घ्यावा लागतो. पंजीकरण आणि परवाना देतांना सरकार कायदयाचे पुर्णपणे पालन होणार असे आश्वासन घेते. ठेकेदार किंवा मालक जर वरील सुविधा हे उपलब्ध

करुन देत नसेल तर ठेकेदाराचा परवाना रद्द केला जातो.

प्रश्न : कामासंबंधी जर कुठली तक्रार असली तर कोठे करावी?

उत्तर : कामाच्या जागेवर सरकारतर्फे कामगार निरीक्षक व कामगार अधिकारी पाठविले जातात आणि जर योग्य सुविधा दिल्या जात नसतील तर त्यांच्या कडे तक्रार केली जावू शकते

प्रश्न : जर त्या प्रदेशातील ठेकेदार किंवा अधिकारी मजुरांचे ऐकत नसेल तर काय करावे?

उत्तर : मजुरांचे त्यांच्या स्वत:च्या प्रदेशातील अधिकारी कामाच्या जागी येवून तपास करु शकतात दुसऱ्या प्रदेशात जाण्याच्या अगोदर आपल्या जिल्हयाच्या कामगार निरीक्षकाला या बाबत माहिती देणे योग्य ठरते.

प्रश्न : दुसऱ्या प्रदेशात गेल्यावर जर एका मालकाकडे पूरेसे काम नसेल तर दुसरे काम शोधु शकतो का?

उत्तर : हो, पण एकदा जर ठेकेदाराचे काम सोडले तर प्रवासी कामगार कायदा लागू होणार नाही. नवीन मालकावर कायदयात सांगितलेले सर्व सुविधा देण्याकरिता दबाव टाकू शकत नाही. पण किमान मजुरी आणि दुर्घटना झालास देण्यात येणारी नुकसान भरपाई आणि इतर कामगार कायदयांचा फायदा नक्कीच मिळतो.

प्रश्न : मालक आणि ठेकेदारांच्या त्यांच्या स्वत:च्या प्रदेशात बराच प्रभाव असतो. जर त्यांनी कायदयाचे पालन केले नाही तर बाहेरुन आलेल्या मजुरांनी काय करावे.

उत्तर : जर काम करत असलेल्या प्रदेशामध्ये कादयाचे उल्लंघन केले जात असेल तर तो कामगार, मजुर स्वत:च्या गावाला परत येवून सहा महीन्यांच्या आत संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार करु शकतो. तक्रार दावा मजुराच्या प्रदेशामध्येच चालविल्या जाणार.

जर मालक किंवा ठेकेदाराकडून कुठल्याही कायद्याचे पालन न झाल्यास त्याची तक्रार येथे करावी

श्रम मंत्रालय – श्रमशक्ती भवन, रफी मार्ग, नवी दिल्ली – ११०००

# ४ कंत्राटी कामगार

कंत्राटी हा शब्द सर्वांना माहित आहे. बरेचशी कामे कंत्राटी पध्दतीने केली जातात. ठेकेदार/कंत्राटदार काम करण्यासाठी कामगारांना कामावर ठेवतात. कंत्राटदार हे कामगाराच्या आर्थिक हितापेक्षा स्वत:चाच जास्त विचार करतात. नेहमीच कामगारांना कमी वेतन देऊन काम करुन घेतात. गरीबी या कारणामुळे कामगार कमी पैशात काम करण्यास हतबल असतात. जर त्यांनी काम करण्यास विरोध केला तर त्यांना कामावरुन काढून टाकण्याची भीती असते. कामगारांच्या या अडचणीला समजून हा कायदा बनविण्यात आला आहे "कंत्राटी कामगार अधिनियम १९७०."

हा कायदा खालील प्रमाणे आहे :

- मालक जर कामगारांना घेवून कंत्राटदार पध्दतीने काम करत असेल तर त्या मालकाच्या नावाची नोंदणी होणे आवश्यक आहे.
- एखादा मालक कंत्राटदार पध्दतीने २० पेक्षा जास्त कामगार जेव्हा ठेवू शकतो ज्यावेळेस त्याच्याकडे अधिकार पद किंवा परवाना असेल.

जो मालक किंवा ठेकेदाराचे नाव नोंदणीकृत असेल व ज्याच्याकडे अधिकारपद किंवा परवाना असेल तो कामगाराच्या कल्याणासाठी जबाबदार असेल जर कामगारांमार्फत कोणाची तक्रार असेल तर शासन त्या मालकाला किंवा कंत्राटदाराला वेतन आणि इतर सुविधा देण्यासाठी भाग पाडू शकते.

काम सुरु झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत कंत्राटदाराने कामगारांना खालील प्रमाणे सुविधा दिल्या पाहिजे—

- पिण्याचे पाणी
- साफसफाई
- शौचालय आणि मुत्रालय
- प्राथमिक चिकित्सा
- छोटी मुले जी ६ वर्षाची आहे त्यांना कंत्राटदाराने कमीत कमी दोन खोल्या दिल्या पाहिजे. एक खोली त्या मुलांना खेळण्यासाठी व दुसरी झोपण्यासाठी पाहिजे. मुलांना खेळण्यासाठी खेळणीची व्यवस्था देखील त्या कंत्राटदारांनाच करावी लागेल.
- जर कामगार ३ महिने काम एकाच ठिकाणी करणार आहे किंवा करावे लागणार आहे आणि



त्यासाठी जर त्यांना तिथेच राहावे लागणार आहे तर कामगारांना आराम करण्यासाठी खोलीची व्यवस्था काम सुरु झाल्यापासून १५ दिवसाच्या आत करुन देणे आवश्यक आहे.

- ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण करणाऱ्या खोल्या असाव्यात
- खोलीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी.
- विश्रांतीची खोली काम करण्याच्या ठिकाणापासून जवळ असावी.
- स्त्रीयांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था पाहिजे. खोलीमध्ये मुबलक हवा आणि प्रकाशाची व्यवस्था पाहिजे.
- काम जर ६ महिन्यापेक्षा जास्त दिवस चालणार असेल आणि तिथे १०० किंवा त्यापेक्षा आधिक कामगार काम करीत असतील, तर तेथे एक कॅन्टीन किंवा भोजनालयाची व्यवस्था केली पाहिजे. त्यामध्ये उचित किंवा किफायतशीर किंमतीत खाणे–पिण्यासाठीचे पदार्थ वस्तु मिळाले पाहिजे.
- कॅन्टीनमध्ये खाण्यासाठी मोठी खोली, स्वयंपाक घर, भंडार घर आणि भांडे धुण्यासाठी जागा असली पाहिजे.
- फरशी स्वच्छ पाहिजे.
- कॅन्टीनमध्ये स्वच्छता पाहिजे.
- गटार बंदिस्त असावे.
- केरकचरा टाकण्यासाठी विशिष्ट जागा पाहिजे
- खाण्याच्या खोलीचा एक हिस्सा महिलांसाठी असला पाहिजे.



- पुरेशी भांडी, टेबल, खुर्च्या असाव्यात.
- कॅन्टीनमधील कामगार स्वच्छ व निटनेटके असावेत.
- जर या सर्व सुविधांची व्यवस्था कंत्राटदार करत नसेल तर मालकाला या सर्व गोष्टींची पुर्तता करावी लागेल.

प्रश्न : वेतन केव्हा, कसे आणि किती मिळाले पाहिजे?

उत्तर :

- वेतन कमीत कमी महिन्यातून एक वेळेस मिळाले पाहिजे.
- वेतन रोख स्वरुपात मिळाले पाहिजे.
- वेतन देण्याच्या वेळेस मालकाचा एक प्रतिनिधी तेथे हजर पाहिजे
- वेतन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची आहे.

प्रश्न : जर कंत्राटदाराने वेतन (मजूरी) दिले नाही तर मालकाकडून कामगार मागु शकता का?

उत्तर:–

- किमान वेतन हे शासनामार्फत निर्धारित केले आहे. वेतन हे किमान वेतनापेक्षा कमी नसेल परंतु त्यापेक्षा अधिक असू शकते.
- बरेचदा असे निदर्शनास येते की, कंत्राटदार वेतनातुन आपले कमीशन कापून

वेतन देतात. हे चूकीचे आहे. अशा पध्दतीत किमान वेतन मिळत नाही. कंत्राटदाराला कमिशन मालक देतो त्यासाठी मालकांनी कंत्राटदारांना अधिक वेतन दिले पाहिजे म्हणजे कंत्राटदार कामगारांना पुर्ण वेतन देतील.

- कामगारांच्या वेतनातुन कंत्राटदार कमीशन कापू शकत नाही.
- मालक आपल्या कामगारांकडून जेवढे तास काम करुन घेतात तेवढेच तास काम कंत्राटदार आपल्या कामगारांकडून घेतले पाहिजे कायमस्वरुपी कामगारांसारख्या (कंत्राटी कामगारांना) सुट्टया मिळण्याचा अधिकार आहे.

जर कंत्राटदार वेतन आणि सुविधा सदर कायदयानुसार देत नसेल तर तो कामगार श्रम अधिकारी किंवा श्रम निरीक्षक यांच्याकडे रिपोर्ट लिहून दाद मागू शकतात.



# ५ बंधित कामगार

श्रम / काम हे मानवी सभ्यतेचे अलंकार आहे. परंतु जेव्हा कधी आपण सक्तीचे श्रम किंवा मजुरीच्या घटना पाहतो, तेव्हा आपल्या ह्या अलंकाराची चमक शोषणाच्या डागांमध्ये हरवून जाते.

सभ्य समाजामध्ये प्रत्येक मनुष्याची समतापुर्ण अभिमान ही स्थिर विकासाचा आधार असते. कोण्या एके काळी मानवाची खरेदी विक्री होत होती,वेळ बदलली, विचार सरणी बदलली आणि शेकडो वर्षाच्या सततच्या संघर्षानंतर पुर्ण जगात अशा परंपरानां संपविण्यात आले परंतु ज्या प्रमाणे आर्थिक प्रगती झाली त्याचप्रमाणे शोषण्याचे मार्ग बदलले. वाढत्या निर्धनतेमुळे लाचारी आणि अमानविय अटींवर काम करण्याची विवशता निर्माण झाली. ३ पिढ्यांपुर्वी ५० रु कर्जाच्या मोबदल्यात एका परिवाराच्या सर्व सदस्यानां आयुष्यभर मजुरी करावी लागे. आज ही गोष्ट काहीशी अविश्वसनीय वाटेल, परंतु भारताच्या प्रत्येक भागात शोषण्याची ही तऱ्हा अस्तित्वात असुन काही ठीकाणी ही परंपरेचा एक भाग बनली आहे. ग्रामीण भागात आर्ध्या पोटी जेवण्याच्या मोबदल्यात जमीनदाराच्या जमीनींवर काम करणारे मजूर असोत किंवा हुड्यांसाठी कापड गिरण्यामध्ये काम करणाऱ्या तरुण मुली असोत किंवा सतत वाढणाऱ्या बांधकाम क्षेत्रासाठी वीट भट्टीवर काम करणारे परीवार. या सर्वांमध्ये बंधित मजुरी अजूनही चालु असुन आधुनिक अर्थव्यवस्थेचा हा फायदेशीर भागीदार झाला आहे. ही एक सामाजिक, आर्थिक समस्या आहे.



निर्धनता अणि त्यातून निर्माण झालेली कर्जबाजारी बंधित श्रम मजूरीचे आणखी दोन प्रमुख कारणे आहेत:—

- शोषीत व्यक्तीला बंधित श्रम कायद्यासंबधीच्या माहितीचा अभाव
- माहिती झाल्यानंतर देखील कायद्यांचा फायदा मिळविण्यासाठी साहसाचा अभाव.

फक्त मारहाण किंवा बांधून ठेवले तरच बंधित कामगार होत नाही, तर अजुन बऱ्याच सहज शोषक परिस्थितींध्ये राहणे देखील बंधीत कामगाराच्या श्रेणीमध्ये ठेवण्यात आले आहे.

बंधित मजदुर कोण होऊ शकते?



- कुठल्याही कारणाने घेतलेले कर्जाची परतफेड ही कामाद्वारे करणारा बंधित कामगार
- गहाण ठेवलेल्या जमिनीला सोडविण्यासाठी बंधित श्रम करणारी व्यक्ती.
- गरज पडल्यास धान्याच्या ऊधारीवर काम करणाऱ्या बंधीत व्यक्ती.
- कोण्या जातीची विशेष व्यक्ती असल्याने बळजबरी काम करणारी व्यक्ती.
- एखाद्या कामाच्या मोबदल्यात आगाऊ मोबदल्याच्या बदल्यात बंधित श्रम करणारी व्यक्ती

<u>बंधित श्रम प्रथा अधिनियम १९७६</u>

बंधित श्रम प्रथा अधिनियम १९७६ च्या अंतर्गत कुठल्याही प्रकारच्या बंधित श्रम मजूरीला बेकायदेशीर ठरविण्यात आले आहे. तसेच हा एक दंडणीय अपराध मानला गेला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर सर्व बंधित कामगार स्वतंत्र तसेच मुक्त घोषित करण्यात आले आहे. ह्या संदर्भात प्रलंबित सर्व खटल्यांमध्ये बंधित मजुरांना मुक्त घोषित करण्यात आले आहे असा कोणताही समझोता/करार वैध मानण्यात येणार नाही, जो एखाद्या व्यक्तीला बंधित कामगार बनवितो असे केल्यास जमीनदार/ठेकेदाराला अधिकतम ३ वर्ष पर्यंत कारावास आणि रु. २०००/— पर्यंतचा दंड होऊ शकतो.

<u>बंधित कामगार कसा बनतो</u>

- धान्य, बी, अन्नधान्य, आजारपण, लग्न, श्राध्द इत्यादीच्या खर्चासाठी जमीनदार/ठेकेदाराकडुन कर्ज घेऊन परत न करण्याच्या स्थितीत जमीनदार/ठेकेदाराद्वारे बळजबरीने मजुर बनविल्यास त्याला बंधित मजुरी म्हणतात
- आपल्या गावात/वाड्यात पोटापाण्याची व्यवस्था न झाल्यास दुसऱ्या शहरात/राज्यात ठेकेदारांकडून कमी मजूरी मध्ये काम करविणे किंवा बळजबरी मजूर बनविल्यास त्यांची ये—जा थांबविल्यास ही सुध्दा एक प्रकारची बंधित मजूरी आहे.



- जास्त मजूरीच्या प्रलोभनांत विनासंमती कामाच्या शर्तीचा स्विकार केल्यावर ये—जा करण्यास व बळजबरी मजूरी करण्यास भाग पाडल्यास
- आई—वडिल/पूर्वजांव्दारे घेतलेल्या कर्जाच्या परताव्याच्या मोबदल्यात मजूरी केल्यास
- एखाद्या जाती विशेषच्या परंपरांचे पालन करण्यासाठी करण्यात येणारी मजूरी. ही सुध्दा बंधित मजूरी आहे

- एखाद्याचे इच्छेविरुध्द त्याच्याकडून मजूरी करुन घेणे.
- उधार किंवा व्याजाच्या परताव्यासाठी बळजबरी मजूरी करुन घेणे
- आगाऊ कर्जाच्या मोबदल्यात बळजबरी मजूरी करुन घेणे
- आपल्या इच्छा व अटींवर काम शोधणे व करणे यावर निर्बंध लादणे
- कर्जाच्या परतफेडीसाठी एखादया व्यक्तीला शारीरीक बंदी बनविणे
- नाम मात्र मजूरी किंवा भरण पोषण साठी बळजबरी मजुरी करुन घेणे

<u>जर एखादी व्यक्ती बंधित मजुरीमध्ये फसली असल्यास काय करावे?</u>

जर तुम्ही कुठल्याही बंधित मजूरीचे शिकार झाल्यास घाबरु नका, आपला कायदा अणि आपले प्रशासन आपल्या बरोबर आहे. अशा स्थितीत आपल्याला खालील अधिकार आहेत.

- आपल्याकडुन करविण्यात येणारी बंधित मजूरी ही एक दण्डनीय अपराध आहे व असे करणाऱ्या व्यक्तीला ३ वर्षांपर्यत शिक्षा आणि २०००/– रु पर्यंत दंड होऊ शकतो.



- आपण तत्काळ प्रभावाने संपूर्ण बंधित मजूरीपासुन मुक्त आहोत अणि ज्या उधारीमुळे आपण बंधित मजुरी करत होता ती ऊधारी आपणांस परत करावी लागणार नाही.
- जर एखाद्या कर्ज वसूलीचा खटला प्रलंबित असल्यास त्यातूनही मुक्ती मिळेल.
- जर उधारीच्या बदल्यांत काही संपत्ती ( जमीन,दागिणे, सामान,जनावर) जप्ती किंवा गहाण ठेवलेली असल्यास ती सुध्दा परत करण्यात येईल. असे झाल्यावर सुध्दा जर जमीनदार आपल्या पैशांच्या परताव्यासाठी दबाव टाकत असल्यास त्याला २०००/–रु पर्यंत दंड आणि ३ वर्ष कैद होऊ शकते.
- कर्जाच्या बदल्यात आपल्या किंवा आपल्या परिवारातील एखादया व्यक्तीला बंधक बनविण्यास आपल्याला मुक्त करण्याची जबाबदारी प्रशासनावर आहे.



- मजूरी दरम्यान मिळालेल्या सुविधांपासून बेदखल करण्यात येणार नाही.

<u>बंधित मजदूरीचा शिकार झाल्यास हे करावे?</u>

- स्वत: किंवा एखादया सामाजिक कार्यकर्त्याच्या माध्यमाने किंवा पंचायत इ. च्या माध्यमाने हया संबंधीची तक्रार संबंधित अधिकाऱ्या (तहसीलदार, प्रभारी, जिल्हा मॅजिस्टर, दंडाधिकाऱ्या) कडे

करावी.

- शक्य तितके आपल्या शासनाचे क्रमवार विविदण तयार ठेवावे? देण्यात येणाऱ्या/ठरलेल्या मजूरीचा हिशेब ठेवावा जेणेकरुन आपली उर्वरीत मजूरी परत मिळविता येईल.
- जास्तीत जास्त लोकांना (पिडीतांना) जागरुक करुन समूहाने तक्रार करावी.
- जर प्राणहानि होण्याची शंका असेल तर विनाविलंब स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करावी तसेच आपल्या मूळ ठिकाणी आपल्या मित्रांना नातेवाईकांना सूचित करावे.

<u>कायदा आपल्यासाठी काय करु शकतो?</u>


- तक्रार प्राप्त झाल्यानंतर जिल्हा दंडाधिकारी किंवा त्याव्दारे नेमलेल्या अधिकाऱ्यामार्फत बंधित मजूरीच्या प्रकरणाचा तपास आणि पिडीत मजूरांची तात्काळ मूक्तीची व्यवस्था करण्यात येईल.
- स्थानिक जिल्हाधिकाऱ्याच्या मार्फत सर्व सोडण्यात आलेल्या पिडीत श्रमिकांना सूटका प्रमाणपत्र देण्यात येतील.
- मजूरांच्या उर्वरित रकमेच्या देयकर्मी नियूक्ती असणाऱ्या व्यक्तीवर कारवाई आणि बंधित श्रम सिध्द झाल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल.
- कार्यस्थळ ते मूळ स्थानापर्यंत प्रवासाची व्यवस्था करण्यात येईल.
- शासनमार्फत निर्धारित पॅकेजच्या अंतर्गत पूर्नवसनासाठी सहायता रक्कम देण्यात येईल.



- मूक्त बंधित मजूरांसाठी केंद्राद्वारे पुर्नवसन योजना प्रत्येक मूक्त बंधित मजूराला पुर्नवसन सहायाच्या रुपात रु. २५०००/–
(किंवा राज्याने निर्धारित केलेली रक्कम) इतकी एकदम देण्यात येते.
- शासनाद्वारा क्रियान्वीत अन्य लाभकारी योजना नरेगा, स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना, आदिवासी विकास योजना इ. फायदा घेतला जाऊ शकतो.

<u>बंधित मजुरी पासुन कसे वाचू शकता?</u>

- जे शक्य तितक्या स्थानिक ग्रामपंचायत किंवा सामाजिक संस्था यांच्याकडून मजूरी पलायन, ठेका मजूरी, न्यूनतम मजुरी, प्रवासी मजूरी इ. विषयांची माहिती घ्यावी.
- आपल्या क्षेत्रात स्वयंरोजगार, नरेगा इ. च्या माध्यमाने आर्थिक आधार सुदृढ करावा व आश्रित जीवनशैलीचा त्याग करावा.



- आकस्मिक आवश्यकतांच्या वेळी स्व–सहायता समूहांशी संपर्क करावा व आपल्याच समूहातून कर्ज व्यवहार पूर्ण करावेत. लग्न समारंभ किंवा मृत्यू संस्कार यांवर व्यर्थ खर्च करु नये.
- आपले भोजन आणि आचार हे व्यवहाराला संतुलित ठेवावे व व्यसनांवर नियंत्रण ठेवावे.
- स्वत: जागरुक रहावे आणि आपल्या समाजाला बंधत्व मूक्त ठेवावे.

## आम्ही आजपर्यंत जाणुन घेतले

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी बहूतांशी लोकसंख्या ही पगारदार आहे. काही कामगार आपल्या गावातच काम करतात परंतु काही कामगारांना पुरेसे काम न मिळाल्याने दुसऱ्या गावास जाणे भाग पडते. कंत्राटदार हा त्या कामगारांना आपल्या राज्यात घेऊन जातो.

कायद्याने कामगारांच्या सुरक्षा अणि चांगल्यासाठी महत्वाचे कायदे बनविले आहेत जे त्यांचा शोषनापासुन संरक्षण करते व बंधित कामापासुन मुक्त करतात.

कामगारांचे खुप काम जोखिमपूर्ण असते. काम करतेवेळी जर एखादी घटना किंवा ईजा होऊन मृत्यु झाल्यास कायद्याने कामगारांना योग्य ती भरपाई देण्याची व्यवस्था केलेली आहे.

हे कामगार कायदे जाणुन घेण्याची सर्व कामगारांना आवश्यकता आहे.

## शेती आणि मजूरी वाल्यांनो

शेती आणि मजूरीवाल्यांनो कायद्याला समजा
जे आपले कर्तव्य आणि अधिकार यांना समजा

श्रम कायद्यानुसार जितकी आहे न्युनतम मजूरी
सर्व मजूरांचा हक्क आहे मिळावी तितकी
दुर्घटना झाल्यावर किती मिळेल भरपाई
शेती अणि....
असंगठित श्रमिकांच्या हक्कांची करतो रक्षा
श्रमिकांनो कायद्यातून मिळते सामाजिक सुरक्षा
कंत्राटी मजूरीच्या सर्व कायद्यांना समजा
शेती आणि....
कायद्याने दिला सहारा आता नाही मजबूरी
बंधन तुटले संपली आता बधित मजूरी
लिहा, वाचा आता या सर्व कायद्यांना समजा
शेती आणि....

# श्रम कायदा – २

# १. अधिकार

नंदु एका डाळीच्या कारखान्यात काम करत होता. सकाळी ८.०० वाजता कामावर जात होता. रात्री ८.०० वाजेपर्यंत काम करत असे. कारखान्यातील सुशिक्षित कर्मचाऱ्यांकडून त्याला समजले की, कामाची वेळ संध्याकाळी ५ वाजेपर्यंतच असते. ५ वाजल्यानंतर जास्त वेळेचे कोणतेही पैसे मिळत नाहीत.

एक दिवस नंदुने त्याच्या पर्यवेक्षकाला विचारण्याचे ठरविले.

नंदु म्हणाला, 'साहेब आम्ही सकाळी ८.०० वाजल्यापासुन ते रात्री ८.०० वाजेपर्यंत काम करत असतो. आम्हाला जास्त कामाचा मेहनताना मिळालाच पाहिजे.'

पर्यवेक्षक म्हणाला, 'जास्त नेतेगीरी करु नको. इथे अनेक वर्षांपासुन असेच होत आले आहे. काम करायचे असेल तर कर नाहीतर दुसरे काम शोध.'

नंदु काहीही न बोलता गप्प बसला.

कारखान्यात दुपारी जेवणाची वेळ झाली. नंदुने पर्यवेक्षकाबरोबर झालेल्या बोलाचालीची चर्चा आपल्या सहका–यांबरोबर केली.

नंदुच्या सर्व साथीदारांनी हिच अडचण होती जी नंदुची होती. नोकरी जाण्याच्या भितीने अन्यायाविरुध्द् कोणीही आवाज उठवत नव्हता.

एक साथीदार कृपाशंकर बोलला, 'मी अस ऐकलय की, कारखान्याचा मालक कायद्यात नमुद केलेल्या बऱ्याच गोष्टींचे पालन करीत नाही. आठवड्यातून एकदा सुट्टी मिळायला पाहिजे. आपल्याला मिळत नाही. शासनाने किमान मजुरी ठरविलेली आहे, माहीत नाही किती आहे. आपल्याला पूर्ण मजूरी मिळते की, नाही याचा पत्ता नाही.'

नंदु म्हणाला, 'आम्हाला तर हे देखील माहीत नाही की कायद्याची माहीती कुठे मिळेल? जर आमच्यावर अन्याय होत असेल तर तक्रार कुठे करायची?'

जवळच बसलेला देवीलाल हे सर्व ऐकत होता. तो कारखान्यातील मजूर संघटनेचा कार्यकर्ता होता.



देविलाल त्यांच्याजवळ जावून म्हणाला, 'म्हणून मी सर्व मजूरांना सांगतो की, संघटनेच्या कार्यालयात या आणि आपल्या अधिकारांची माहीती करुन घ्या. संघटना तुमची ताकद आहे, तुमच्या मदतीसाठी संघटना आहे.'



नंदु आणि त्याच्या साथीदारांच्या चेहऱ्यात एक नवीन चमक आली.

या आता जाणून घेवू या, श्रमकायदा मजुरांच्या हितांचे कशा प्रकारे रक्षण करतो.

या कायद्याला किमान मजूरी कायदा म्हणतात, कित्येक वेळा गरिब, अडाणी व निरागस मजुरांकडून काम करवून घेतले जाते. काम जसे की, शेतामध्ये, रस्ते बनविण्याकरिता, घर बांधण्याकरिता, तंबाखु किंवा बिडी कारखान्यात, विटभट्ट्यांवर, दगड फोडणाऱ्या खाणीवर, दुकानांच्या धंद्यावर, कार्यक्रमांच्या तयारी करिता, इत्यादींमध्ये परंतु मजुरीच्या बदल्यात पैसे दिलेच जात नाहीत किंवा कमी दिले जातात. अशिक्षित व असंघटीत असल्याने त्यांचे शोषन केले जाते.

# २. किमान मजूरी कायदा



किमान मजूरी कायद्यात अगोदरच ठरलेल्या व्यवसायासंबधी मजूरीचे दर ठरविले जातात. कुठल्या उद्योगधंद्यात किती मजूरी मिळायला हवी याकरिता उद्योगधंद्यात यादी बनविलेली असते. पाच वर्षातून एकदा केंद्र सरकार किंवा राज्य सरकार मजुरीचे दर ठरवितात.

प्रश्न : मजुरीचा अर्थ काय आहे?

उत्तर : या अधिनियमानुसार मजुरीचा अर्थ हा आहे की, एका व्यक्तिने दुसऱ्या व्यक्तिकरिता केलेल्या श्रमाबदलचा मोबदला. मजुरीमध्ये खालील लिहिलेले सर्व मुद्दे आहेत.

- न्यायालयाच्या आदेशाने अथवा समझोत्याने दिलेली रक्कम.
- जास्त वेळ किंवा सुट्टीत केलेल्या कामाबदलची रक्कम.
- बोनस किंवा त्याप्रकारची कोणतीही रक्कम.
- मजुराची सेवा संपल्यावर दिलेली रक्कम.
- एखाद्या कायद्यानुसार अथवा योजनेनुसार दिलेली रक्कम.

प्रश्न : मजुरीत काय काय येते?

उत्तर : बक्षीस, बोनस भले कोणत्याही फायद्यातील हिस्सा असु दे किंवा अन्य जे काम पुर्ण केल्यावर मिळेल परंतु मजुरीचा हिस्सा असणार नाही.

- कोणतेही रस्ते, घर, विज, पाणी, औषधोपचार किंवा अन्य सवलती किंवा अशा सवलती ज्यांची किंमत राज्य सरकारच्या आदेशाने मजुरीपासून वेगळे ठेवले आहे.
- पेंशन किंवा भविष्य निधीवर मालकाचे योगदान व त्यावरील व्याज
- कोणत्याही प्रवासात अथवा प्रवास भत्यात सुट
- एखाद्या मजुराला त्याच्या कामाच्या प्रमाणानुसार दिलेली रक्कम, उदाहरणार्थ एखाद्या मजुराला विशिष्ट मशिन चालविण्यात होणाऱ्या धोक्यांकरीता दिलेली अतिरिक्त रक्कम.
- नोकरी संपण्यावर मजुराला मिळणारे उपदान.

प्रश्न : कर्मचारी कोण ?

उत्तर : या अधिनियमानुसार त्या व्यक्तिला कर्मचारी मानले जाते जो भाड्याने किंवा बक्षीसासाठी कुशल किंवा अकुशल काम तसेच अतिरिक्त किंवा लिपिकाचे काम करतो. ज्याकरिता किमान मजुरी ठरविलेली असते. यामध्ये बाहेरचे जे मजूर येतात जे कोणत्याही प्रकारच्या परिसरात खालील काम करतात.



- एखादी वस्तु बनविण्याचे काम
- साफ सफाई करण्याचे काम
- दुरुस्ती करण्याचे काम
- वस्तु विकण्याचे काम
- हाताने केलेले लिहिण्याचे लिपिक काम

प्रश्न : नियोजक/मालक कोण असतो ?

उत्तर : या अधिनियमानुसार त्या व्यक्तिला मालक किंवा नियोजक म्हणता येईल जो एखाद्या मजुराला स्वत: किंवा दुसऱ्याव्दारे, ज्या ठिकाणी किमान मजुरी कायदा लागु आहे अश्या ठिकाणी कामाला लावतो.

- या व्यतिरिक्त कोणीही व्यवस्थापक किंवा कारखान्याचा मालक
- कोणतेही असे काम की ज्यावर सरकारी नियंत्रण आहे. तिथे सरकारच्या वतीने काम पाहणारा किंवा नियंत्रण ठेवणारा नेमलेला, व्यक्ती मालक म्हणविली जाईल. जिथे अशा प्रकारे नेमलेला नसेल तिथे विभाग प्रमुखाला किंवा प्रमुख अधिकाऱ्याला मालक म्हणता येईल.

प्रश्न : किमान मजुरी कोण ठरवितो ?

उत्तर : किमान मजुरी शासनाद्वारे वेळोवेळी ठरविली जाते. हा किमान मजुरीचा दर रहाण्याच्या खर्चासकट असतो किंवा नसतो देखील.

शासन दर पाच वर्षाच्या अंतराने किमान मजुरीचा दर ठरवितो.

प्रश्न : सर्व मजुरांना सारखी मजुरी मिळते का?

उत्तर : नाही! या कायद्यानुसार चार प्रकारचे मजुर असतात, त्यांच्या कामाच्या स्वरुपानुसार मजुरी ठरविली जाते.

<u>मजुरांचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत.</u>

अकुशल : असा मजुर की ज्यांना जेवढे काम दिले जाते किंवा सांगितले जाते तेवढेच करतो.

अर्धकुशल : जो शक्यतो एक काम करतो, जे त्याला नेहमी सोपविले जाते, स्वत:तर्फे कोणताही निर्णय घेत नाही.

कुशल : जो कामाच्या वेळी निर्णय घेतो, काम योग्यप्रकारे करतो, तसेच तांत्रिक कौशल्याने काम देखील करतो.

अतिकुशल : कुशल कामगारापेक्षा जास्त सक्षम असतो.

प्रश्न : मजुरीच्या स्वरुपात काय मिळते ?

उत्तर : या कायद्यानुसार पगार भत्ते रुपयात दिले जातील. परंतु शासनास असे वाटले की, काही क्षेत्रामध्ये पैशाच्या बदल्यात वस्तु देण्याची परंपरा आहे, असे शासनास वाटल्यास शासन तसे अधिसुचित करु शकतो.

प्रश्न : मजुरांना मजुरी कधी मिळते?

उत्तर :
- जिथे रेल्वे, कारखाने, औद्योगिक किंवा इतर संस्था जेथे एक हजारापेक्षा कमी व्यक्ती काम करत आहेत, तिथे मजुरी देण्यास निश्चित केलेल्या दिवसाच्या ७ दिवस अगोदर मजुरी वाटली गेली पाहिजे. इतर ठिकाणी १० दिवसाच्या आत.
- संस्था बंद झाल्याने नोकरीवरुन काढून टाकल्यास मजुरी नोकरीवरुन काढून टाकल्याच्या दुसऱ्या दिवशी वाटली गेली पाहिजे.

- मजुरीचा काळ हा जास्तीत जास्त ३० दिवसांचा असेल. मजुरी काळाचा अर्थ एक अशी वेळ की ज्यानंतर मजुर हा मजुरी घेण्याचा हक्कदार असतो.

प्रश्न : जर मजुराकडून ठरलेल्या वेळे व्यतिरिक्त जास्त काम करुन घेतले तर कायदा काय सांगतो?

उत्तर : नियमानुसार एखाद्या मजुराची कमीत कमी मजुरी, कामाचे तास, दिवस इत्यादी ठरविलेले आहेत आणि तो मजुर ठरविलेल्या वेळेपेक्षा जास्त काम करत असेल तर मालकाला जास्तीच्या वेळेचा पगार द्यावा लागेल.

प्रश्न : मजुरी कापली जाते का?

उत्तर :
- होय, मजुरीमधून कपात ह्या नियमानुसार केली जाईल. मजुराने मालक किंवा त्याच्या एजंटला दिलेली रक्कम कपात मानली जाईल.
- अधिनियमानुसार मजुरीमधील कपातीची काही प्रमुख कारणे खालील प्रमाणे.
  - दंड
  - कामावर न येण्याच्या कारणास्तव
  - मजुराच्या देखरेखीत ठेवलेल्या मालाच्या अथवा पैशाच्या होणाऱ्या नुकसानाकरिता
  - मालक, शासन किंवा एखाद्याला गृहनिर्माण संस्थेद्वारा रहाण्याकरिता केलेल्या सोयी करीता, मजुराद्वारे दिलेल्या आयकराकरिता.
  - न्यायालय किंवा एखाद्या प्राधिकरणाने दिलेल्या आदेशान्वये.
  - व्यवसाय संघाची फि करिता
  - विम्याच्या पॉलिसी करिता
  - मजुराच्या फायद्यासाठी बनविलेल्या निधीकरिता

प्रश्न : असमान कार्याकरिता किमान पगार किती असतो?

उत्तर :
- जर एखादा मजुर एकापेक्षा जास्ती कामे करतो व ती कामे एकसारखी नसतात आणि ज्यांचे किमान मजुरीचे दर देखील सारखे नसतात तर मालकाला त्यांच्या कामांच्या वेळानुसार त्या संबंधीत कामांकरिता उपलब्ध असलेली कमीत कमी मजुरी द्यावी लागेल.
- जर एखाद्या कामाची मजुरी वस्तु बनवण्यावर असते आणि ती वेळेवर आधारित आहे तर मालकास त्यावेळेची ठरलेली मजुरी द्यावी लागेल.



- या अधिनियमानुसार कामाचे तास ठरविण्याबरोबर मजुरांना आठवड्यातून एकदा सुट्टी देखील दिली जाईल.

प्रश्न : नोंदवही किंवा रेकॉर्डमध्ये काय काय लिहिले जाते?

उत्तर : कोणताही मनुष्य जो ठेकेदार किंवा मजुराकडून काम करुन घेतो त्याला एक नोंदवही ठेवावी लागेल ज्यामध्ये खालील लिहिलेल्या गोष्टी असतील.

- मजुरी नोंदवही
- हजेरी नोंदवही, मजुरी–मजुर तथा रक्कम
- दंड नोंदवही
- नुकसानाकरिता कपात
- ठरविलेल्या वेळेपेक्षा जास्त कामाच्या रक्कमेची नोंदवही
- भेटायला येणाऱ्याची अथवा निरीक्षक नोंदवही

प्रत्येक मजुराला मजुरी देण्याअगोदर कामाची वेळ तसेच पैसे नोंदवलेली चिठ्ठी मिळायलाच पाहिजे. जेणेकरुन त्याला हे समजायला हवे की, त्याला किती काम दिले आहे तसेच पैसे किती मिळनात.

प्रश्न : कामावर लक्ष ठेवण्याकरिता नेमलेल्या निरीक्षकांचे काम काय असते?

उत्तर :
- शासन किमान मजुरी कायद्यानुसार निरीक्षक नेमू शकतो आणि त्याच्या कामाचे अधिकार, शक्ती व मर्यादा ठरवु शकतो.
- निरीक्षक अशा कोणत्याही जागेचे निरीक्षण करु शकतो, जेथे मजुर काम करतात.
- तो कोणतेही रेकॉर्ड, कागदपत्र जप्त करु शकतो अथवा त्यांच्या छांयाकित प्रति घेऊ शकतो.
- निरिक्षक हे देखील जाणून घेऊ शकतो की, किमान मजुरी किती दिली जाते व ती केलेल्या नियमानुसार दिली जाते की नाही.

प्रश्न : मजुरी संबंधी तक्रार कोण करु शकतो.

उत्तर : मजुरीमधून कपात केली असेल किंवा मजुरी देण्यास उशीर झाला असेल तिथे खालील व्यक्ती अर्ज करु शकते.

- स्वत: मजुर किंवा वकीलामार्फत
- एखादी नोंदणीकृत कामगार संघटना किंवा निरिक्षक किंवा
- अधिकाऱ्याची परवानगी घेतल्यानंतर इतर व्यक्ती.

प्रश्न : मजुरी संबंधी तक्रारी कोठे केल्या जातात?

उत्तर : जर एखाद्या मजुराला मजुरीच्या किमान दरांचा हिशोब मिळत नसेल तर तो श्रम आयुक्तांकडे त्याबाबत तक्रार करु शकतो. शासन श्रम आयुक्तांची नेमणूक करेल.

- मजुर आपल्या दाव्याकरिता स्वत: आपली बाजु मांडू शकतो त्याला वकीलाची गरज नाही. जर त्यास वाटले तर तो त्याचे प्रकरण सादर करण्याकरिता वकिलाची अथवा कामगार संघटनेतील एखाद्या अधिकाऱ्याची नेमणूक करु शकतो.
- आवश्यक नाही की, किमान मजुरीचे दर मिळाले नाहीत त्या दिवसापासुन सहा महिन्याच्या आत दावा दाखल केला आहे.
- दावा किंवा अर्ज घेतल्यावर श्रमआयुक्त मजुर आणि मालक या दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकेल व पूर्ण तपासाअंती निकालाबाबत सुचना करेल.
- श्रम आयुक्त अर्जदारास जी रक्कम किमान मजुरीपेक्षा कमी मिळाली आहे, ती रक्कम देण्याचे आदेश देऊ शकतो तसेच त्याबद्दल भरपाई देण्याचे देखील आदेश देऊ शकतो जी त्या रक्कमेपेक्षा १० टक्के जास्त होणार नाही.
- अर्जाची सुनावणी करणारा अधिकारी दिवाणी न्यायालयाचा समकक्ष मानला जाईल आणि सर्व प्रक्रिया हि दिवाणी प्रकरणात चालविली जाते त्याप्रमाणे होईल.
- या अधिनियमाच्या अंतर्गत सुनावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचा निर्णय शेवटचा असेल.

प्रश्न : मजुरावर कोणत्या तऱ्हेचा दंड लावू शकतो का?

उत्तर : मजुरावर एखादे काम केले अथवा न केले याबाबत तोपर्यंत दंड लावू शकत नाही जोपर्यंत मालकाने राज्य सरकार किंवा त्याच्याद्वारा नेमलेल्या एखाद्या अधिकाऱ्याकडून दंड लावण्याची पूर्व परवानगी घेतली नसेल आणि अशा कामांची यादी ज्यांच्यावर दंड लावला जाईल त्याची सुचना संस्था किंवा रेल्वे संबंधीत कारखाने सोडून एखाद्या योग्य ठिकाणी लावली नसेल.

प्रश्न : मजुरावर जर मजुरीसंबंधी अत्याचार झाला तर दंड काय केला जाईल?

उत्तर :
- जर एखादा मालक एखाद्या मजुराला जर अधिनियमानुसार ठरविलेली किमान मजुरी देत नाही तर त्याला ६ महिने जेल किंवा रुपये ५००/– दंड किंवा दोन्ही होऊ शकते.
- जर अत्याचार एखाद्या कंपनीद्वारा केला असेल तर ती व्यक्ती जी त्यावेळी कंपनीच्या कामाची प्रभारी असेल त्याला कंपनीबरोबर जबाबदार धरले जाईल.



प्रश्न : मजुराचा मृत्यु झाल्यास मजुरी कुणाला द्यावी?

उत्तर : ● जर एखाद्या मजुराचा मृत्यु झाला तर त्याची मजुरी खालील व्यक्तीपैकी कुणातरी एकाला दिली जाईल.

● मजुराद्वारा नामनिर्देशित केलेल्या व्यक्तिला

● जिथे एखाद्या व्यक्तिला नामनिर्देश मजुराने केले नसेल तर ती रक्कम संबंधीत अधिकाऱ्याजवळ जमा केली जाईल.

## ३.गृह/बांधकाम व्यवसायातील श्रमिकांचे अधिकार



आपल्या देशातील तसेच प्रदेशातील ९० टक्यांपेक्षा अधिक श्रमिक मजूर हे असंगठित क्षेत्रात कार्यरत आहेत. आणि या असंगठित श्रमिकांमध्ये मोठ्या प्रमाणात गृह/बांधकाम व्यवसायातील श्रमिकांचा / मजूरांचा समावेश आहे.

प्रश्न : बांधकाम व्यवसायातील श्रमिक / मजूर जे घरं, पूल, बांध, कालवे, विद्युतगृह इत्यादी आपल्या मेहनतीने बनवतात त्यांच्या काय काय समस्या आहेत?

उत्तर : ● रोजगारात अनियमितता

● रोजगारासाठी आपले घर–गाव सोडण्याची दुर्दैवी वेळ

● आजारपण किंवा अपघात झाल्यास इलाज किंवा नुकसान

● भरपाईची व्यवस्था नसणे.

● मुलांच्या शिक्षणाची तसेच महिला मजूरांच्या लहान मुलांची देखभालीची व्यवस्था नसणे.

● मजूरी नियमांनुसार न मिळणे इत्यादी.

प्रश्न : या समस्यांना दूर करण्यासाठी सरकारने कायदे बनविले आहेत का?

उत्तर : या समस्येचे निराकरण करण्यासाठी दोन कायदे तयार करण्यात आले आहेत.

पहिला कायदा– गृह/बांधकाम किंवा अन्य व्यवसायातील कर्मचारी नियोजन तसेच सेवा शर्ती विनियमन अधिनियम १९९६.

दुसरा कायदा– गृह तसेच अन्य बांधकाम निर्माण कर्मचारी कल्याण उपकरण अधिनियम १९९६.

प्रश्न : पहिल्या कायद्यात काय तरतूदी आहेत?

उत्तर : ० ह्या कायद्यात मजूरांच्या कामाबाबत तसेच त्या कामाच्या स्थितीबद्दल नियम आहेत.

० मजुरांच्या स्वास्थ्य, सुरक्षा आणि कल्याणासंदर्भात कायदे आहेत.

प्रश्न : हा कायदा कोणकोणत्या निर्माण कार्यांना लागू होतो?

उत्तर : हा कायदा कोणत्याही व्यक्तीच्या वैयक्तिक राहण्यासाठी तसेच १० लाखांपेक्षा कमी खर्च येणाऱ्या बांधकामाला सोडून इतर सर्व निर्माण/बांधकाम कार्यासाठी लागू होतो.

प्रश्न : हा कायदा कधी लागू होतो.

उत्तर : हा कायदा जेव्हा एखाद्या निर्माण / बांधकाम कार्यात १२ महिन्यांमध्ये कोणत्याही दिवशी १० पेक्षा अधिक मजुरांनी काम केले असल्यास लागू होतो.

प्रश्न : दुसऱ्या कायद्यामध्ये काय आहे?

उत्तर :

- राज्य स्तरावर कल्याण निधिची स्थापना आणि त्याच्या कामकाजासाठी राज्यस्तरिय कल्याण मंडळ देखील बनविले आहे.
- बांधकाम व्यवसायातील मजूरांच्या कल्याणासाठी/ निधीसाठी पैशांची तरतूद करण्यासाठी बांधकामांवर कर लावण्याचा कायदा सुध्दा तयार करण्यात आला आहे.

प्रश्न : हा कायदा कधी बनविण्यात आला आणि कधी लागू झाला?

उत्तर : हा कायदा १ जानेवारी २००३ ला नियम बनवून १० एप्रिल२००३ पासून लागू करण्यात आला.

प्रश्न : या कायद्यात बांधकाम मजूर कोणाला मानण्यात आले आहे.

उत्तर : या कायद्यानुसार बांधकाम मजूर त्यांना मानले जाईल जे गृह, नाले, कालवे त्यावरील पूल, सुरूंग, पूरनियंत्रण काम, रल्वे, विमानतळ, पाईपलाईन, टॉवर, विजनिर्मिती, सिंचन, टेलिफोनतारा इत्यादी कामात कार्यरत आहेत.





श्रमिकांच्या कल्याणासाठी मंडळाच्या योजना लागू आहेत त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारे श्रमिकांना विविध क्षेत्रांमध्ये लाभ मिळतात.

प्रश्न : कर्मचारी मंडळाच्या कल्याण योजनांचा लाभ कसा मिळेल?

उत्तर : कोणत्याही श्रमिकाला जर कर्मचारी मंडळांच्या कल्याण योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर त्याला स्वत:ची नोंदणी संबंधित मंडळात करावी लागेल. तेव्हा तो या योजनांचा लाभ घेण्यासाठी योग्य मानला जाईल.

प्रश्न : या मंडळात मजुरांचे/श्रमिकांची नोंदणी कधी होते?

उत्तर : १८ ते ६० वयोमर्यादेत असलेला श्रमिक किंवा मजूर त्याने मागील १२ महिन्यात कमीतकमी ९० दिवस बांधकाम कामासाठी मजूरी केली असेल अशा श्रमिकाची/मजूरांची नोंदणी होते.

प्रश्न : नोंदणी करण्यासाठी किती फी लागते?

उत्तर : नोंदणी कर २५ रूपये असून दोन पासपोर्ट आकाराचे फोटोसहित संपूर्ण माहिती भरून मंडळात अर्ज द्यावा लागेल.

प्रश्न : नोंदणी फी भरल्यानंतर काय करावे लागते?

उत्तर : नोंदणीनंतर श्रमिकाला/मजूराला एका फोटोसहित ओळखपत्र मिळेल. नोंदणी झाल्यानंतर श्रमिकाला वयाच्या ६० वर्षापर्यंत सरकारी मासिक दरापेक्षा कमी रक्कम मंडळात प्रत्येक महिन्याला जमा करावी लागेल. मालकास सुध्दा मजूरीमधून कापून मंडळास पाठविण्यासाठी श्रमिक सांगू शकतात.

प्रश्न : काय, नोंदणी रद्द किंवा समाप्तपण होऊ शकते?

उत्तर : एक वर्ष सलग पैसे जमा न केल्यास नोंदणी रद्द होऊ शकते.

प्रश्न : मंडळाकडून काय काय लाभ मिळतील?

उत्तर : मंडळाकडून खालीलप्रमाणे सोई सुविधा श्रमिकांना मिळतील.

| | |
|---|---|
| १. वृद्धावस्था पेंशन | — तीन वर्षे नोंदणी आवश्यक |
| २. परिवार पेंशन | — तीन वर्षे नोंदणी आवश्यक |
| ३. अपंग, विकलांग सहायता | — एक वर्षे नोंदणी आवश्यक |
| ४. घर खरेदी किंवा बनविण्यासाठी | — पाच वर्षे नोंदणी आवश्यक |
| ५. बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्यासाठी | — तीन वर्षे नोंदणी आवश्यक |
| ६. शिष्यृत्ती | — एक वर्ष नोंदणी आवश्यक |
| ७. बँकेकडील शिक्षण कर्ज व्याजावर अनुदान | — तीन वर्ष नोंदणी आवश्यक |
| ८. उत्पन्न वाढ होण्यासाठी सहायता | — तीन वर्ष नोंदणी आवश्यक |
| ९. विवाह सहायता | — तीन वर्ष नोंदणी आवश्यक |
| १०.उपचार सहायता | — तीन वर्ष नोंदणी आवश्यक |
| ११.अपघात झाल्यावर उपचार सहायता | — लागू नाही. |
| १२.प्रसूती/मूल झाल्यावर सहायता | — एक वर्ष नोंदणी आवश्यक |
| १३.विमा सहायता | — एक वर्ष नोंदणी आवश्यक |
| १४.मृत्यू झाल्यावर अंतिम संस्कार सहायता | — लागू नाही. |

वर लिहिलेल्या सुविधा मंडळ आपल्या संसाधनानुसार तसेच प्राथमिकता लक्षात घेवून वेळोवेळी ठरवून सुविधा पुरविल. मंडळाद्वारा केले जाणारे इतर कार्य खालील प्रमाणे–

- सर्वेक्षण आणि अभ्यास
- जागरूकता / प्रचार आणि प्रसार
- स्वास्थ्य तसेच परिवार कल्याणाची कामे
- खेळ तसेच सांस्कृतिक कार्यक्रम

अखेर बांधकाम निर्माण क्षेत्रातील श्रमिकांनी / मजूरांनी अधिक संख्येने नोंदणी करून मंडळाच्या सुविधांचा लाभ घ्यावा.

# ४. मानव तस्करी

प्रश्न : मानव तस्करी म्हणजे काय?

उत्तर : भारतात काही ठिकाणी मानव व्यापार म्हणजे पुरूष / स्त्रिया यांची खरेदी विक्री असे गैरकायदेशीर काम होते. याला मानव तस्करी असेही म्हणतात.

प्रश्न : जगामध्ये मानव तस्करीच्या किती घटना येतात?

उत्तर : संपूर्ण जगभरात दरवर्षी जवळजवळ ६ ते ८ लाख पुरूष, महिला व मुले यांची खरेदी/विक्री होते, किंवा त्यांची तस्करी होते. याचपैकी ८० टक्के महिला व ५० टक्केच्या जवळपास अज्ञान मुलांचा समावेश असतो.

प्रश्न : मानव तस्करी का होते?

उत्तर : महिला व मुलांकडून देहविक्रय करून, भीक मागावयास लावून किंवा त्यांना नोकर बनवून त्यांचे शोषण केले जाते.

प्रश्न : मानव तस्करीची कारणे कोणती आहेत?

उत्तर : मानव तस्करीची कारणे खालीलप्रमाणे आहेत–

- रोजगार मिळण्याची साधने कमी होणे.
- आर्थिक असमानता, विभागीय असंतुलन आणि सामाजिक भेदभाव असणे.
- वेश्यागमनासाठी मुलींची मागणी तसेच मजूरीसाठी मजूरांची मागणी असणे.
- महिलांबाबत आर्थिक तसेच सामाजिक भेदभाव असणे तसेच महिला या पुरूषांवर अवलंबून असणे.
- पोलिसांच्या क्रियाशीलतेत कमतरता, जनतेतील जागरूकतेची कमतरता, वेश्यांबाबत आकर्षण.
- निराधारपणा, अशिक्षितपणा आणि अंधविश्वास.

प्रश्न : मानव तस्करी कशी केली जाते?

उत्तर : मानव तस्करीची सुरूवात गरीब व असहाय्य लोकांच्या विवशतेचा फायदा घेवून प्रलोभने दाखवून केली जाते.

जसे की–––

- नोकरीचे प्रलोभन
- शरण देणे
- पैसे / संपत्ती देवून ऋणी बनविणे.
- हे काम फसवून किंवा बळजबरीने केले जाते. बळी पडलेल्या व्यक्तीवर हळू–हळू शारिरीक क्लेशाचा फास आवळत जातो.
- आणि या कारणामुळे त्याकडून गुलामासारखी वागणूक देवून देह व्यापार

देखील करवला जातो.

- ० मानव तस्करी किंवा देह व्यापार करताना हिंसा, बळजबरी, धमकी किंवा फसवणूकीने बळी पडलेल्या व्यक्तिची ओळख किंवा प्रवासाचे कागदपत्र लपवून ठेवले जातात.

प्रश्न : मानव तस्करी रोखण्यासाठी काय करता येते?

उत्तर : मानव तस्करी रोखण्यासाठी पिडितांना वाचविले पाहिजे, त्यांच्याशी चर्चा करणे, सल्ला देणे तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ जबाब नोंदवून न्यायालयात दाखल करून तस्करांना अटक करवून या अपराधाला रोखता येते.

प्रश्न : मानव तस्करी रोखण्यासाठी कायद्यात कोणकोणत्या तरतूदी आहेत?

उत्तर : मानव तस्करी / व्यापार रोखण्यासाठी कायद्यातील तरतूदी खालीलप्रमाणे आहेत—

- ❖ भारतीय दंड सहिंता १८६०
- ० कलम ३६६(अ), अज्ञान मुलींना शरीर विक्रीसाठी विकणे
- ० कलम३७२ मुलांना देह व्यापारासाठी विकणे
- ० कलम ३७३ अज्ञान मुलांना देह व्यापारासाठी खरेदी करणे
- ० कलम ३६६ (ब) अज्ञान मुलींना परदेशात निर्यात करणे
- ० कलम ३७६ (२)(जी) सामूहिक बलात्कार

वरील सर्व गुन्हे / अपराध हे मानव तस्करी संबंधातील आहेत. हे गुन्हे अजामीनपात्र आहेत.

प्रश्न : या अपराधांबाबत खटला कोठे चालतो?

उत्तर : सत्र न्यायालयात. या अपराधाची १० वर्षांपर्यंत शिक्षा करण्याची तरतूद आहे.

प्रश्न : मानव तस्करी रोखण्यासाठी कोणते उपाय आहेत?

उत्तर :
- ० या समस्येच्या निराकरणासाठी प्रोटेक्शन, प्रीवेन्शन आणि प्रोसीक्युशन म्हणजेच संरक्षण, प्रतिबंध तसेच फिर्याद करावी लागते.
- ० बचाव सहायता, पुर्नवसन तसेच पीडितांना पुन्हा त्यांच्या परिवारात पाठविण्याच्या प्रक्रियेवर कारवाई करावी लागेल.
- ० आपल्या गावातील असे लोक जे महिला, मजूर किंवा अज्ञान मुले यांना नोकरी किंवा कामधंद्याची लालूच दाखवूनच नेण्यासाठी येतात, त्यांच्या बाबत पोलिस किंवा जबाबदार लोकांना सुचित केले पाहिजे.

लोकांमधील जागरूकता या अपराधाला रोखण्यासाठी महत्वाची भूमिका बजावू शकते.

# ५. कर्मचारी राज्य विमा अधिनियम १९४८

प्रश्न : या कायद्याचा उद्देश काय आहे?

उत्तर : कर्मचारी राज्य विमा अधिनियम १९४८, शासनाने सामाजिक हितासाठी उचललेले एक महत्वाचे पाऊल आहे. या अधिनियमामुळे कर्मचाऱ्यांना आजार, बाळंतपण आणि कामाचे ठिकाणी झालेल्या अपघातामुळे झालेली दुख:पत अशा प्रसंगी फायदा मिळतो. याबरोबरच त्यांना नोकरी करत असताना होणारे विविध आजाराचे परिस्थितीत त्यांच्यासाठी देय असलेल्या विम्याची रक्कम मिळण्यासाठी हा अधिनियम उपयोगी पडतो.

प्रश्न : कर्मचारी राज्य विमा योजना कोण चालवतो व राबवतो?

उत्तर :
- कामगार विमा योजना महामंडळ कामगारांचे हितासाठी ही योजना राबवते व चालवते.
- कामगार राज्य विमा महामंडळाची एक स्थायी समिती असते व एक वैद्यकिय लाभ परिषद (समिती) ही असते जी त्याच्या कार्यप्रणालीस कार्यान्वीत होणेसाठी सहयोगी ठरत असते.

प्रश्न : या कार्यालयाचे मुख्य अधिकारी कोण असतात?

उत्तर : खालील अधिकारी या कार्याची अंमलबजावणी करित असतात.
- महासंचालक
- आर्थिक आयुक्त महासंचालक हा महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी असतो.

प्रश्न : वैद्यकीय लाभ परिषदेचे काय काम असते?

उत्तर :
- ही परिषद महामंडळ आणि स्थायी समितीना वैद्यकिय लाभाशी निगडीत प्रशासकिय सल्ला देते आणि इतर संबंधीत प्रकरणात काम करते.
- वैद्यकिय अधिकाऱ्याचे विरुध्दच्या वैद्यकीय उपचार उपस्थिती संबंधीत तक्रारीची चौकशी करते.
- अधिनियमाचे संबंधीत वैद्यकीय उपचार आणि उपलब्धता/अंमलबजावणी याबाबतची सर्व कामे करत असते.

प्रश्न : सर्व कामगारांचा विमा असतो का?

उत्तर : हा कायदा लागू असणाऱ्या अशा सर्व कर्मचाऱ्यांचा विमा असतो.

प्रश्न : या कायद्याचे फायदे कोणकोणते असतात?

उत्तर : विमाधारक व त्यांच्यावर अवलंबून असणारे व्यक्तींना खालील प्रमाणे फायदे होतात.

<u>आजारपणातील फायदे</u> — आजारपणाचे काळात विमाधारक व्यक्तींना हप्त्याहप्त्यांनी लाभ

| | | |
|---|---|---|
| | | दिला जातो. |
| <u>बाळंतपणाचे वेळीची फायदा/तरतुद</u> | — | गरोदर महिलांना, आजार, गर्भपात किंवा बाळंतपणाचे मुदतीचे आत बाळंतीन झाल्यास त्यांना हप्त्याहप्त्याने ठराविक रक्कम दिली जाते. |
| <u>अवलंबीत असणाऱ्यांना फायदे</u> | — | अपघात किंवा मृत्यू झाल्यास विमाधारकावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना विम्याचा फायदा मिळू शकतो. |
| <u>वैद्यकीय फायदा</u> | — | काम करताना जखमी झालेल्या व्यक्तीस पात्रता व परिस्थिती प्रमाणे वैद्यकीय उपचार व सेवेचा फायदा मिळतो. |
| <u>अंत्यसंस्कारासाठी खर्च</u> | — | विमा धारक व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याच्या अंत्यसंस्कारासाठीच्या खर्चाची रक्कम त्यांच्या परिवारातील सर्वात मोठ्या व्यक्तीस मिळू शकते. |

प्रश्न : फायदा संयुक्तरित्या होवू शकतो का?

उत्तर : खालील प्रमाणे परिस्थितीमध्ये विमाधारक व्यक्तीस एकत्रीत लाभ मिळू शकतो.

: — आजारपण आणि बाळंतपणासाठीचा फायदा

: — आजारपण आणि तात्पुरत्या स्वरुपाचे अपंगत्वाचा फायदा.

: — बाळंतपण आणि तात्पुरत्या स्वरुपाचे अपंगत्वाचा फायदा.जर एखादी व्यक्ती एकापेक्षा जास्त लाभ घेण्यासाठी पात्र असेल तर त्यास अशावेळी कोणता तरी एकच फायदा घेण्याबाबत ठरवावे लागते.

प्रश्न : दाव्याची प्रकरणे कशी हाताळली जातात?

उत्तर : राज्य सरकारने खटल्यांच्या निर्णय प्रक्रियेसाठी स्वतंत्र कर्मचारी विमा न्यायालयाची स्थापना केलेली आहे.

प्रश्न : कार्यकारी विमा न्यायालयात कोणत्या प्रकारची प्रकरणे हाताळली जातात?

उत्तर : कर्मचारी विमा न्यायालयात खालीलप्रमाणे वादाचे विषयासंबंधीत प्रकरणाची दखल घेतली जाते.

१ या कायद्याअंतर्गत येणारी व्यक्ती कर्मचारी असेल किंवा तो कर्मचारी अंशदान

जमा करण्यासाठी पात्र विधीवत असेल.

२ या नियमानुसार निर्धारित पगार व सरासरी रोजंदारी पगार किती आहे?

३ मुख्य नियोक्ताद्वारे जमा केली जाणारी ज्या अंशदानाचा दर काय आहे?

४ मुख्य नियोक्ता कोण होता किंवा कोण आहे?

५ एखादा लाभ मिळणेसाठी व्यक्तीची पात्रता.

६ अर्थिक रक्कम आणि काळ किती असेल?

७ अवलंबून असणारे वारसांना मिळणारे लाभाचे बाबत महामंडळाकडून निर्धारित केलेल्या मार्गदर्शक सूचनाचे आकलन कसे होईल.

८. खालील उल्लेखीत घटकांमधील अंशदान, लाभ किंवा इतर देणे किंवा वसुलीचे संदर्भातील कोणत्याही वादाचे निराकरण.

— मुख्य नियोक्ता आणि महामंडळ.

— मुख्य नियोजक आणि तत्कालीन नियोक्ता.

— व्यक्ती आणि महामंडळ.

— नियोक्ता आणि मुख्य किंवा तत्कालीन नियोक्ता.

— कर्मचारी विमा न्यायालयाचे कोणतेही निर्णयाशी संबंधीत, कोणत्याही प्रकारची सामुग्री अथवा माहितीशी संबंधीत.

अशा प्रकारे कर्मचारी विमा न्यायालय सामान्यता निम्नलिखीत खटल्यांचे निवारणाचे काम करते.

१४. मुख्य नियोक्त्याचे कडील अंशदान रक्कमेची वसूली.

१५. एखाद्या तत्कालीन नियोक्त्या कडील अंशदानाची वसूली.कलम ६८ चे अधिन एखाद्या मुख्य नियोक्त्याच्या विरुध्दचे प्रकरणाची सुनावणी व निवारण.

१६. अशा रक्कमेची वसूली जी एखाद्या व्यक्तीने ती कायदेसंमत नसताना स्वत:चे हितासाठी मिळवलेली असेल किंवा रक्कमेचा अपहार केलेला असेल.

लक्षात ठेवा की, जर कर्मचारी विमा न्यायालया समक्ष एखादे प्रकरण दाखल केले गेले असेल तर —कलम ५४(अ) (२) प्रमाणे अशा सर्व प्रकरणांचे निराकरण करणेसाठी न्यायालय सक्षम आहे.

प्रश्न : कर्मचारी विमा न्यायालयात जाणेसाठी काहीकाळ मर्यादा असते का?

उत्तर : अर्ज दाखल केलेपासूनच कामकाजाची प्रक्रिया सुरु होते. विवाद निर्माण झाल्यापासून ३० वर्षाचे आतचे कालावधीत न्यायालयात अर्ज केला जावू शकतो.

प्रश्न : या नियमाप्रमाणे कशा प्रकारच्या शिक्षेची तरतूद आहे.

उत्तर : जर एखाद्यांनी जाणून बुजून खोटे विधान व खोटी माहिती सादर केली असेल तर त्यास खालीलप्रमाणे उल्लेखीत कारणासाठी ६ महिने कैद अथवा २०००/— रुपये पर्यंत दंड अथवा दोन्हीही शिक्षा होवू शकते.

१. एखादी प्राप्तीची रक्कम किंवा फायदा वाढवण्याबाबत.
२. गैर कायदेशिर मार्गाने वसूली करणेबाबत.
३. त्या मार्गाने केली गेलेली वसूली रोखणे बाबत.
४. अशा प्रकारे वसूली रोखणेसाठी एखाद्या व्यक्तीस सहकार्य करणेबाबत. या कलमाअंतर्गत कोणीही विमाधारक व्यक्ती येत असेल तर अशा व्यक्तीस केंद्र सरकारतर्फे निर्धारीत कसल्याही प्रकारची रक्कम अदा केली जाणार नाही.

अंशदानाची रक्कम जमा न केल्यास दंड

| अपराध | दंड |
|---|---|
| निर्धारित अंशदान जमा न करणे. | ३ वर्षे पर्यंत कैद परंतु (अ) जर एखाद्या कर्मचाऱ्याच्या पगारातून अशी रक्कम कपात करुन घेतली गेली जी रक्कम नियोजनाच्या निर्धारित अंशदानाची रक्कम होती. तर अशा कृत्यास १ वर्ष कैदेची शिक्षा व १०,०००/– रुपयेचा दंड ठोठावला जाईल. (ब) इतर प्रमाणात शिक्षेचा कालावधी ६ महिने आणि दंडाची रक्कम ५०००/– रुपये पेक्षा कमी नसेल. |
| ● कर्मचाऱ्यांची अंशदानाची रक्कम पूर्णपणे किंवा काही प्रमाणात कपातीचा प्रयत्न<br>● कर्मचाऱ्याचा निर्धारित फायदा किंवा त्याला मिळणाऱ्या रकमेतुन कपात<br>● कोणत्याही कर्मचाऱ्यास नोकरीवरुन कमी करणे किंवा दंड देणे<br>● रिटर्न जमा करण्यास नकार देणे किंवा खोटे रिटर्न दाखल करणे.<br>● या अधिनियमातील नियमांकडे दुर्लक्ष करणे. | एक वर्षाची कैद किंवा रु. ४०००/– दंड किंवा दोन्हीही |

# सामाजिक आर्थिक अधिकार

# १. कथा – माहितीचा हक्क

आजदे गावात रस्ता बांधणीचे काम चालू झाले. सरपंचाने सर्व नियम धाब्यावर बसवून खराब रस्ता बनवला. परिणाम सर्वांच्या समोर होता. काही दिवसांतच रस्ता उखडला, जागोजागी रस्त्यावर खड्डे पडले.

जेव्हा गावातील काही लोकांनी रस्ता बांधणीच्या खर्चाबद्दल हिशोब विचारला तेंव्हा सरपंचांनी त्यांना काहीही सांगण्यास नकार दिला. सरपंच म्हणाले, हा आमचा मामला आहे तुम्हा लोकांना काहीही माहिती करुन घेण्याचा अधिकार नाही.



बैजापुर गावातील लोक स्वस्त धान्य दुकानावर फेऱ्या मारुन त्रस्त होते. प्रत्येक वेळेस गहू संपले हेच बाबुरावचे उत्तर असायचे. तांदूळ नाही, साखर एक–दोन दिवसात येईल, रॉकेल एक आठवड्यानंतर मिळेल.

एके दिवशी गावातील सगळे लोक मिळून स्वस्त धान्य दुकानावर गेले. त्यांनी बाबुरावला त्याच्या दुकानातील नोंदवही दाखवा असे म्हटले, आम्हाला देखील पहायचे आहे किती सामानाची आवक झाली व किती सामान गेले.

बाबुराव रागात म्हणाला, मी कोणतीही नोंदवही दाखवणार नाही. करुन घ्या काय करायचे ते सरपंचाच्या नकाराने अगर बाबुरावाच्या रागाने गावकऱ्यांचा माहिती प्राप्त करुन घेण्याचा अधिकार कमी होत नाही.

<u>आजदे गावच्या लोकांना या गोष्टी माहित करुन घेण्याचा अधिकार आहे की–</u>

- रस्ता तयार करण्यासाठी किती पैसा खर्च झाला?
- रस्ता तयार करण्यासाठी किती लोकांना रोजगार मिळाला व त्यांना किती मजूरी मिळाली?
- रस्ता तयार करण्याचा निर्णय ग्रामपंचायत/ग्रामसभेच्या कोणत्या बैठकीत घेण्यात आला ?
- रस्ता तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल कुठून व कोणत्या दराने विकत घेतला?
- रस्ता एवढा खराब का बनवला?
- रस्ता तयार करण्याचे कंत्राट कोणाला दिले.

गावातील लोकांना रस्त्याशी संबंधित सर्व कागदपत्रांची तपासणी करण्याचा अधिकार आहे

बैजापुर गावातील लोकांना या गोष्टी माहित करुन घेण्याचा अधिकार आहे की–

- स्वस्त धान्य दुकानावर केंव्हा व किती सामान आले?
- आतापर्यंत किती लोकांना सामानाचे वाटप करण्यात आले?
- किती धान्यसाठा सध्या शिल्लक आहे?
- आवक–जावक व साठा शिल्लक नोंदवहीची काय स्थिती आहे?

गावातील लोकांना स्वस्त धान्य दुकानाशी संबंधीत सर्व प्रकारची माहिती व कागदपत्रांची माहिती करुन घेण्याचा अधिकार आहे.

माहिती करुन घेणे खूप आवश्यक आहे-

जनता कराच्या रुपात सरकारला पैसे देते. यातूनच सरकार आपले काम चालवते. सरकारी कार्यात जनतेचा म्हणजेच आपला पैसा भरपूर लागतो. यासाठीच आपल्याला प्रत्येक आवश्यक असणाऱ्या गोष्टीची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. जर सर्व कामांची खुली माहिती असेल तर भ्रष्टाचार कमी होईल. सरकारमध्ये पारदर्शकता येईल.

- सरकार आणि शासन लोकांसाठी आहे आणि ते कायद्यापासून वाचलेले नाही.
- काम योग्य रितीने झाले नाही तर सरकारला जबाबदार ठरविले जाऊ शकते.
- जनतेशी निगडित सर्व कामे गरजेनुसार झाली पाहिजेत. यासाठी सर्व कामांची सगळी माहिती मिळविणे जरुरी आहे.

यासाठीच सरकारने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू केला आहे

# २. माहितीचा अधिकार, २००५

प्रश्न : जाणण्याच्या हक्क म्हणजचे माहितीचा अधिकार काय आहे?

उत्तर :

- सन २००५ मध्ये भारत सरकारने देशवासीयासाठी कायदेशीररित्या माहितीचा अधिकार प्राप्त करुन दिला आहे. या कायद्यानुसार भारतातील कोणताही नागरिक कोणत्याही सरकारी कार्यालयातून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त करुन घेऊ शकतो. फक्त सेना आणि सुरक्षा मंत्रालयाशी संबंधीत काही माहिती ज्या पासून आपल्या देशाला धोका आहे याच्याशी निगडित माहिती आपण प्राप्त करु शकत नाही. सरकारी कार्यालयांतून माहिती प्राप्त करुन घेण्याचा आता सर्व लोकांना अधिकार आहे.
- जसे आपणा सर्वांना माहित आहे की, सरकारद्वारा देशातील गरीब आणि वंचित लोकांच्या विकासासाठी अनेक प्रकारच्या योजनांची आखणी करण्यात येते. या योजना चालविण्यासाठी सरकार करोडो रुपये खर्च करते, परंतु ते पैसे

कुठे व कसे खर्च झाले व त्याचा खरोखरच फायदा कुणाला मिळाला याची माहिती लोकांना मिळत नव्हती. सरकारी कार्यालयात माहिती मागूनही ती माहिती त्यांना मिळत नव्हती. माहिती देणे अथवा न देणे सर्वस्वी सरकारी अधिकाऱ्यांवर अवलंबून होते. सन २००५ पासून माहितीचा अधिकार कायदा लागू करण्यात आल्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांसाठी हे आवश्यक झाले आहे की, लोकांनी मागितलेली माहिती त्यांना द्यावी.



- आपल्या देशातील जवळ जवळ सर्व लोकांना सरकारी कार्यालयात कोणत्या ना कोणत्या प्रकारचे काम पडत असते. जातीचे प्रमाणपत्र काढायचे असो अथवा रेशन कार्ड काढायचे असो किंवा इतर कोणत्याही योजनेचा लाभ घ्यायचा असो या कामांसाठी कित्येक वेळा सरकारी कार्यालयात खेटे मारावे लागतात. परंतु आता लोक माहितीच्या आधिकारामुळे या कामांशी संबंधीत सर्व माहिती मागू शकतात. जर एखाद्याचे रेशन कार्ड तयार झाले नसेल तर तो विचारु शकतो की, त्याचे रेशन कार्ड का तयार केले नाही तसेच जर एखाद्या व्यक्तीने एखाद्या कार्यालयाकडे अर्ज दिला तर तो हे माहित करु शकतो की त्या अर्जावर संबंधित कार्यालयाने काय कारवाई केली?

प्रश्न : आपण कोणती माहिती प्राप्त करुन घेऊ शकतो?

उत्तर :
- माहिती अधिकाराअंतर्गत आपण कोणत्याही सरकारी कार्यालयातील कोणतीही माहिती मागू शकतो. आपल्या जवळपास दोन प्रकारची सरकारी कार्यालये आहेत. अशी कार्यालये जी राज्य सरकारच्या अधिपत्याखाली येतात. जसे की तहसील, महसुल, पोलिस, जलसंपदा, कृषी, शिक्षा, आरोग्य इत्यादी. त्याचबरोबर सार्वजनिक सेवेतील शाळा, अंगणवाडी, स्वस्त धान्य दुकान, रूग्णालये हे देखील राज्य सरकारच्या अधीन असतात.



- दुसरी अशी कार्यालये आहते की

जी केंद्र सरकारच्या अभिपत्याखाली येतात जसे की पोस्ट ऑफिस, बॅंक, रेल्वे इत्यादी. त्याच बरोबर न्यायालयातून देखील आपण या कायद्याद्वारे माहिती प्राप्त करुन घेऊ शकतो. याशिवाय आपण अशा संस्थांकडूनदेखील माहिती मागवू शकतो ज्यांना सरकारकडुन वित्तीय अनुदान मिळते. पंचायत व नगर पंचायतीकडून देखील सर्व प्रकारची माहिती प्राप्त केली जाऊ शकते

माहिती अधिकाराअंतर्गत आपण सरकारी कार्यालयातून खालील स्वरुपात माहिती मागवू शकतो –

१. कोणत्याही कागदपत्रांची प्रमाणित छायांकित प्रत.
२. कागदपत्रांसंबंधीत आकड्यांची सीडी, फ्लॉपी, वीडीयो कॅसेट.
३. प्रकाशित कागदपत्रे.
४. कागदपत्रांच्या मूळ प्रती पाहू शकतो म्हणजे त्या तेथे बसून वाचू शकतो आणि आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती देखील मागु शकतो.

प्रश्न : माहिती अधिकाराची माहिती कोण देणार?

उत्तर : माहिती अधिकाराची माहिती देण्याकरीता सरकारद्वारा प्रशासकीय आराखडा तयार करण्यात आला आहे. हा प्रशासकीय आराखडा अगर सरकारी तंत्र प्रत्येक कार्यालयात तयार करण्यात आले आहे. या अंतर्गत प्रत्येक विभागातील प्रत्येक कार्यालयात एक सहाय्यक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी तथा अपीलीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली गेली आहे जी याप्रमाणे आहेत :

१. <u>जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जन माहिती अधिकारी</u>

प्रत्येक सरकारी कार्यालयात एक जन माहिती अधिकारी असतो. हा जन माहिती अधिकारी गट, जिल्हा, व प्रांत स्तरावरील अस्तित्वात असलेल्या सर्व कार्यालयात नियुक्त केला गेला आहे. जन माहिती अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांद्वारा माहितीच्या अधिकारानुसारचे अर्ज स्वीकारले जातात, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आपण आपला अर्ज जन माहिती अधिकारी वा सहाय्यक जन माहिती अधिकारी यांना देऊ शकतो.

२. <u>अपीलीय अधिकारी</u>

प्रत्येक कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांस अपीलय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले आहे. उदाहरणार्थ पंचायत कार्यालयातील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला जनपद पंचायतचे जन माहिती अधिकारीचा दर्जा प्राप्त झालेला आहे. जिल्हा पंचायतच्या मुख्य कार्यकारी आधिकाऱ्याला जनपद पंचायतचे अपीलीय अधिकारी म्हणून मानले गेले आहे. जर आपल्याला मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांद्वारा निर्धारित वेळेत अगर खरी माहिती दिली गेली नाही तर आपण त्यावर अपीलीय अधिकाऱ्यांकडे अपील करु शकतो.

३. <u>राज्य माहिती आयोग</u>

माहिती अधिकाराचे कायद्याअंतर्गत प्रत्येक राज्यस्तरावर एक राज्य माहिती आयोगाची

स्थापना करण्यात आली आहे. जर आपल्याला अपीलीय अधिकाऱ्यांद्वारा आपण मागितलेली कोणतीही माहिती दिली गेली नाही तर आपण दुसरे अपील राज्य सूचना आयोगाकडे करु शकतो. यामध्ये मुख्य माहिती आयुक्त आणि अन्य १० माहिती आयुक्त नियुक्त करण्यात आले आहे. राज्य माहिती आयोगाची नियुक्ती राज्यपालांद्वारा एका समितीच्या शिफारशीवरुन केली जाते. या समितीचे अध्यक्ष राज्याचे मुख्यमंत्री असतात, सोबत विरोधी पक्षाचे नेते व मुख्यमंत्रीद्वारा नामनिर्देशित एक मंत्री या समितीचे सदस्य असतात यांचा कार्यकाळ ५ वर्षांचा असतो. माहितीच्या अधिकाराशी संबंधित माहिती आयोगाला दिवाणी न्यायालयांप्रमाणे अधिकार दिले गेले आहेत. ते माहितीच्या अधिकाराशी संबंधीत प्रकरणांवर सुनावणी करु शकतात, समन्स काढू शकतात तसेच माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्याला शासन देखील करु शकतात. राज्यात स्थापित माहिती आयोगाचे पत्ते खालील प्रमाणे आहेत :

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग

१३वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०० ०३२.

४. केंद्रीय माहिती आयोग :–

केंद्र सरकारच्या संबंधीत कार्यालये जसे पोस्ट ऑफिस, बँक, रेल्वे विभाग जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकाऱ्यांद्वारा माहिती दिली गेली नाही तर आपण केंद्रीय माहिती आयोगाकडे दुसरे अपील करु शकतो. केंद्रीय माहिती आयोग आपल्याला ती माहिती पुरवेल व माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यांस शासन करेल.



यामध्ये एक मुख्य माहिती आयुक्त व १० केंद्रीय माहिती आयुक्त असतात. मुख्य माहिती आयुक्तांची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारा एका समितीच्या शिफारशीवरुन केली जाते. या समितीचे अध्यक्ष पंतप्रधान असतात व लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते व प्रधानमंत्री द्वारा नियुक्त एक मंत्री या समितीचे सदस्य असतात. त्याचा पत्ता आहे.

केंद्रीय माहिती आयोग

ब्लॉक नं. ०४, ५वा मजला, जुने जे.एन.यू. कॅम्पस,

नवी दिल्ली, फोन – ०११–२६७१७३५४

माहिती कशा प्रकारे प्राप्त कराल?

४.१ अर्ज देणे :–

या कायद्यानुसार माहिती मागविण्यासाठी आपणास एक अर्ज तयार करावा लागेल त्या अर्जामध्ये आपल्याला नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याचा स्पष्ट उल्लेख करावा लागतो. उदाहरणार्थ आपण एखाद्या ग्रामपंचायतचा खर्चाचा हिशोब मागू इच्छित असाल तर आपल्याला हे लिहिणे पुरेसे नाही की, "ग्रामपंचायतच्या खर्चाचा हिशोब द्या." परंतु

आपणास हे लिहावे लागेल की ग्रामपंचायत (ग्रामपंचायतचे नाव) कोणत्या वर्षापासून ते कोणत्या वर्षापर्यंत जमा खर्चाचे विवरण पाहिजे आहे. किंवा ग्रामपंचायतीने केलेल्या कोणत्या वर्षाच्या कामाचे विवरण पाहिजे. अर्ज तयार केल्यानंतर आपण संबंधीत विभागाच्या जन माहिती अधिकाऱ्यांना अर्ज द्या. जर जन माहिती अधिकारी उपस्थित नसेल तर सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांना अर्ज देऊ शकतो. (अर्जाचा नमुना या पुस्तकाच्या पुढील पानावर दिलेला आहे.) माहिती मागवताना हे सांगणे जरुरी नाही की ती माहिती आपणास का हवी आहे.

या कायद्याच्या कलम ६(१) मध्ये असे सांगितले आहे की, जर एखाद्या व्यक्तीस अर्ज लिहिण्यास अडचण असेल तर जन माहिती अधिकारी त्याचे म्हणणे ऐकून घेऊन त्यास अर्ज लिहीण्यास मदत करेल आणि जन माहिती अधिकारी अर्ज घेण्यास नाकारु शकणार नाही. जर तो अर्ज घेण्यास त्याने नकार दिला तर त्याची तक्रार अपीलीय अधिकारी तथा राज्य माहिती आयोगकडे करु शकतो. केंद्र सरकारच्या कार्यालयाशी संबंधित तक्रार केंद्रीय माहिती आयोगाकडे पाठवा.

४.२ पावती जरुर घ्या :— अर्ज देते वेळेस अर्जाची पावती जरुर घ्या. ही पावतीच आपण माहिती मागण्याचा अर्ज दिल्याबाबतचा पुरावा आहे. माहिती न मिळाल्यास या पावतीची अपील करते वेळी गरज पडेल.

४.३ माहिती प्राप्त करुन घेणेसाठी शुल्क :— माहितीचे अधिकाराअंतर्गत माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी काही शुल्क ठरविण्यात आले आहे. जे १० रु. रोख जमा करुन त्याची पावती घेण्याचे विसरु नये. अथवा १० रु. चे बिगर न्यायालयीन स्टॅम्पपेपर अर्जासोबत जोडावे. परंतु माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दारिद्रयरेषेखालील कुटुंबाला कोणत्याही प्रकारचे शुल्क देण्याची आवश्यकता नाही. त्यांना सर्व माहिती नि:शुल्क देण्यात येईल. त्यासाठी त्यांना दारिद्रय रेषेखालील (बी.पी.एल.) रेशन कार्डची छायांकित प्रत अर्जासोबत जोडावी लागेल. जेणेकरुन संबंधित अधिकाऱ्यास अर्जदार खरोखरच दारिद्रयरेषेखालील कुटुंबाचा असल्याची खात्री होईल. याशिवाय वेगवेगळी माहिती प्राप्त करुन घेण्याचे शुल्क वेगवेगळे आहेत ते खालीलप्रमाणे :—

१. ए३ किंवा ए४ कागदावर माहितीसाठी प्रति पान २ रु. प्रमाणे द्यावे लागेल.
२. मोठ्या आकाराचे कागदावर फोटो कॉपीसाठी योग्य रक्कम
३. सीडी किंवा फ्लॉपी रु. ४०.
४. नोंदवही किंवा कागदपत्रांचे निरीक्षण एक तास किंवा त्यापेक्षा कमी वेळेकरीता ५० रु. व पुढील प्रत्येक तासाकरीता रु. २५ द्यावे लागतील.

फोटोकॉपीच्या स्वरुपात माहिती देताना प्रत्येक पानावर संबंधित अधिकाऱ्याची स्वाक्षरी असून त्यावर शिक्का असला पाहिजे. जर आपल्याला असे वाटत असेल की आपल्याला देण्यात आलेली माहिती ही पाहिजे असलेल्या माहितीपेक्षा वेगळी आहे तर आपण अपीलीय अधिकाऱ्यांपुढे अपील करु शकता.

४.४. माहिती केव्हा मिळेल :—

या कायद्याअंतर्गत अर्ज दिल्यानंतर ३० दिवसाच्या आत माहिती देण्याचा नियम आहे. जर माहिती एखाद्या व्यक्तीच्या जीवनाशी किंवा व्यक्तीगत स्वातंत्र्याशी निगडित असेल तर ती माहिती ४८ तासाच्या आत देण्याचा नियम आहे.

५. माहिती न मिळाल्यास काय कराल?

आपल्याला अपेक्षित माहिती ३० दिवसाच्या आत न मिळाल्यास आपण अपील करु शकता. त्यासाठी २ अपीलांचा नियम या कायद्यात आहे.

५.१ प्रथम अपील :—

माहिती न मिळाल्यास पहिले अपील अपीलीय अधिकाऱ्यांसमोर केले जाईल. त्यासाठी एक अर्ज द्यावा लागेल. त्यात असे लिहावे लागेल की "जन माहिती अधिकाऱ्यांनी आपण मागितलेली माहिती ३० दिवसांचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर देखील दिली नाही." प्रथम अपीलच्या अर्जासोबत ५० रु. चे शुल्क जमा करावे लागेल. आपण हे शुल्क रोखीने देखील भरु शकता अथवा ५० रु. किंमतीचे गैर न्यायीक स्टॅम्प पेपरच्या अर्जावर अर्ज लिहून देऊ शकता

प्रश्न : दारिद्रय रेषेखाली जीवन व्यतीत करणाऱ्यांना देखील शुल्क द्यावे लागेल काय?

उत्तर : नाही. दारिद्रय रेषेखाली जीवन व्यतीत करणाऱ्या कुटुंबांना शुल्क जमा करण्याची आवश्यकता नाही. अपीलाच्या अर्जासोबत जन माहिती अधिकारी किंवा सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या पावतीची छायांकित प्रत जरुर लावा हे अपील माहिती प्राप्त होण्याची तारीख समाप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे.

५.२ द्वितीय अपील :—

जर अपीलीय अधिकाऱ्यांद्वारा आपल्याला अपेक्षित माहिती दिली गेली नसेल तर आपण दुसरे अपील राज्य माहिती आयोगाकडे करु शकता. दुसरे अपील करते वेळेस १०० रु. शुल्क जमा करावे लागेल. आपल्याला जर वाटले तर आपण १०० रु. च्या गैर न्यायीक स्टॅम्प पेपर वर अर्ज लिहून किंवा टंकलिखीत करुन पाठवू शकता.

प्रश्न : दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना देखील पैसे जमा करावे लागतील काय?

उत्तर : नाही. दारिद्रयरेषेखाली जीवन व्यतीत करणाऱ्या अर्जदाराला १०० रु. शुल्क जमा करण्याची आवश्यकता नाही. तो आपला अर्ज साध्या कागदावर लिहून किंवा टंकलिखीत करुन देऊ शकतो. दुसरे अपील अपीलीय अधिकाऱ्या द्वारा माहिती न दिल्यापासून ९० दिवसांच्या आत केले पाहिजे.

५.३ <u>माहिती न दिल्यास शिक्षा</u>

- माहिती अधिकार अंतर्गत अर्जदारास माहिती देण्याची जबाबदारी जन माहिती अधिकाऱ्याची आहे. जर जन माहिती अधिकाऱ्याने माहिती दिली नसेल किंवा चुकीची माहिती दिली असेल तर आपण अपीलीय अधिकाऱ्यांसमोर पहिले अपील

करु शकतो.

- पहिल्या अपीला नंतर देखील माहिती न दिल्यावर राज्य माहिती आयोगाकडे आपण दुसरे अपील करु शकतो. राज्य माहिती आयोग घटनेची सखोल चौकशी करुन माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यास २५० रु. प्रतिदिवस या प्रमाणे जास्तीत जास्त २५००० रु. पर्यंत दंड होऊ शकतो.
- अशा प्रकारे स्पष्ट होते की, जन माहिती अधिकारी किंवा सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी अर्ज घेण्यास नकार दिला किंवा वेळेवर माहिती दिली नाही किंवा जाणूनबुजून चुकीची माहिती दिली किंवा मागितलेली माहिती नष्ट केली या बाबी दंडनीय मानल्या गेल्या आहेत. त्याचबरोबर माहिती आयोग, जन माहिती अधिकाऱ्यांच्या अशा कृत्यासाठी सेवानियमानुसार अनुशासनात्मक कारवाई करण्यासाठी राज्य सरकारकडे शिफारस करु शकतो.



माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती
प्राप्त करण्यासाठीचा अर्ज

---

१. अर्जदाराचे नाव :
२. अर्जदाराचा संपूर्ण पत्ता /ईमेल/फॅक्स ज्यावर माहिती पाठवावयाची आहे
३. अर्जदाराचा फोन नंबर
४. अर्जाचा दिनांक
५. कार्यालयाचे नाव
६. कोणती माहिती हवी आहे.
७. माहिती कोणत्या स्वरुपात पाहिजे (कागदपत्रांची प्रमाणीत प्रत /अभिलेख पाहणी/सीडी)
८. अर्जासोबत जमा केलेल्या १० रु. चे विवरण .................... पावती नंबर ..............
९. अर्जदार हा दारिद्रयरेषेखाली जीवन व्यतीत करणाऱ्या कुटुंबापैकी आहे की काय जर तसे असेल तर त्याचा दारिद्रयरेषा यादीतील अनुक्रमांक ............................. गावाचे नाव ........................... . ग्रामपंचायतचे नाव ..............................................
(दारिद्रय रेषेखालील राशनकार्डची छायांकित प्रत लावावी)

अर्जदाराचे हस्ताक्षर
नाव : ..............................................................................

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती प्राप्त करण्यासाठी अर्जाची पावती

- अर्ज प्राप्त झाल्याचा दि. ..................................................
- अर्जदारास मागितलेली माहिती प्राप्त करुन देण्यास पुढील कारवाईसाठी उपस्थित राहणेसाठीचा दि. ...................
- संबंधित शाखा/अधिकारी जिथून माहिती मिळेल ...................................
- हस्ताक्षर
- जन माहिती अधिकारी किंवा सहाय्यक जन माहिती अधिकारी
- पदनाम व शिक्का

---

# ३.राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५

प्रश्न : ग्रामीण भागातील लोकांना रोजगार देण्यासाठी कोणता कायदा बनवला गेला आहे?



उत्तर : ग्रामीण भागातील लोकांना रोजगार देण्यासाठी "राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५" हा कायदा तयार करण्यात आला आहे.

प्रश्न : रोजगार मिळवण्यासाठी काय करावे लागते?

उत्तर : काम मिळविण्यासाठी रोजगार कार्ड (जॉब कार्ड) बनवावे लागते. त्यासाठी परिवाराच्या मुख्य व्यक्तीस ग्रामपंचायतीकडे अर्ज द्यावा लागतो. अर्जामध्ये परिवारातील सर्व सज्ञान लोकांचे नाव, वय, पत्ते इत्यादी माहिती लिहावी लागते. सगळयांचे फोटोदेखील लावावे लागतात. हे कार्ड नि:शुल्क बनवले जाते.

प्रश्न : रोजगार कार्ड किती दिवसात तयार होते ?

उत्तर : अर्ज मिळाल्यानंतर पंचायत त्यात लिहिलेल्या माहितीची तपासणी करते. परिवाराचे नाव रोजगार यादीमध्ये समाविष्ट करते, १५ दिवसाच्या आत रोजगार कार्ड दिले जाते. हे कार्ड कमीत कमी ५ वर्षांकरीता बनविले जाते.

प्रश्न : कार्ड बनविल्यानंतर रोजगार कोणास मिळतो?

उत्तर : जर एखादा परिवार अकुशल शारिरीक मेहनत करण्यास राजी असेल तर एका वेळी त्याचे कोणत्याही एका सज्ञान सदस्यास रोजगार मिळतो.

प्रश्न : किती दिवसांचा रोजगार मिळतो?

उत्तर : परिवारातील सर्व सज्ञान सदस्यांना मिळून कमीत कमी १०० दिवसाचे काम मिळते. म्हणजे कुणीही एक सदस्य १०० दिवस काम करु शकतो किंवा एक पेक्षा जास्त सदस्य मिळून १०० दिवस काम करु शकतात.

प्रश्न : कामासाठी कुणाला अर्ज द्यावा लागतो?

उत्तर : रोजगार कार्ड बनविल्यानंतर परिवाराच्या कोणत्याही एका सदस्याला ग्रामपंचायत किंवा योजना अधिकारी यांच्याकडे अर्ज द्यावा लागतो. रोजगार हमी योजनेस योग्य तऱ्हेने चालविण्यासाठी गट विकास स्तरावर योजना अधिकारी बनविले गेले आहेत. अर्ज मिळाल्यानंतर ग्रामपंचायत किंवा योजना अधिकारी एक पावती देतात. ती सांभाळून ठेवावयास हवी.

प्रश्न : अर्ज दिल्यानंतर किती दिवसात काम मिळायला पाहिजे?

उत्तर : अर्ज दिल्यानंतर १५ दिवसाच्या आत काम मिळणे आवश्यक आहे कामासाठीची माहिती पंचायतीद्वारा दिली जाते

प्रश्न : कामासाठी कोठे जावे लागते?

उत्तर : कामासाठी गावापासून ५ कि.मी.च्या आत कुठेही जावे लागू शकते. ५ कि.मी. पासून अधिक अंतर असल्यास १० टक्के जादा मजूरी मिळते. गटविकास स्तराच्या बाहेर काम दिले जात नाही.

प्रश्न : जर काम मिळाले नाही तर काय होईल?



उत्तर : अर्ज दिल्यापासून १५ दिवसाच्या आत काम मिळाले नाही तर बेरोजगार भत्ता दिला जातो. बेरोजगार भत्त्याचा दर राज्य सरकारद्वारे निश्चित केला जातो.

प्रश्न : कोणत्या परिस्थितीत बेरोजगार भत्ता मिळत नाही?

उत्तर : खाली नमूद केलेल्या परिस्थितीमध्ये बेरोजगार भत्ता मिळत नाही–

- दिले गेलेले काम करण्यास नकार दिला
- बोलावल्यानंतर १५ दिवसात कामावर आले नाही तर
- न सांगता १ आठवडा कामावर गैरहजर राहिले तर

प्रश्न : कामाची मजूरी कोणत्या हिशोबाने दिली जात?

उत्तर : मजूरी दर हप्त्याच्या हिशोबाने दिली जाते. त्याचा दर राज्य सरकार शेतमजूराच्या कमीत कमी मजूरीइतकी निश्चित करते. १५ दिवसात मजूरी दिली जाते. मजूरी ही रोख स्वरुपात दिली जाते.

प्रश्न : काम करण्याच्या ठिकाणी कोण कोणत्या सुविधा दिल्या जाणे आवश्यक आहेत?

उत्तर : काम करण्याच्या जागेवर मजुरांसाठी :

- पिण्यासाठी स्वच्छ पाणी
- विश्रांतीसाठी सावलीची जागा
- सर्वसाधारण इलाजाची सोय असणे आवश्यक आहे.

प्रश्न : कामावर असलेल्या मजूरांमध्ये किती महिला असणे जरुरी आहे?

उत्तर : कामावर असलेल्या लोकांच्या १/३ महिला असणे आवश्यक आहे.

प्रश्न : महिला मजुरांच्या मुलांसाठी कोणत्या सुविधा मिळतात?

उत्तर : महिला मजुरांबरोबर ६ वर्षापेक्षा कमी वयाचे ५ पेक्षा जास्त मुले असतील तर एका महिलेला त्यांची देखभाल करण्यासाठी नेमले जाते. अशा महिलेला पण दुसऱ्या मजुरांइतकीच मजुरी दिली जाते.



प्रश्न : काम करते वेळी जखम झाल्यास अगर दुर्घटना झाल्यास कोणत्या सुविधा मिळतात?

उत्तर : काम करते वेळी जखम झाल्यास विनामूल्य इलाज केला जातो. दुर्घटनेत जखमी झाल्यास दवाखाना, औषधे व इलाजाच्या खर्चाबरोबरच मजूरीच्या कमीत कमी निम्मा हिस्सा त्यास दैनिक भत्याच्या रुपात दिला जातो.

प्रश्न : काम करत असताना मृत्यू झाल्यास अगर अपंग झाल्यास किती नुकसान भरपाई मिळते?

उत्तर : काम करत असताना मृत्यू झाला असता मयताच्या कायदेशीर वारसांना अगर अपंग झाल्यास त्यास २५,००० रु. नुकसान भरपाई दिली जाते

प्रश्न : कामाच्या वेळी बरोबर असलेल्या बालकास हानी झाल्यास काय कारवाई केली जाते?

उत्तर : कामाच्या वेळी बरोबर असलेल्या बालकास दुखापत झाल्यास त्याचा इलाज विनामुल्य केला जातो. बालकाचा मृत्यू झाल्यास अगर अपंगत्व आल्यास राज्य सरकारद्वारा ठरविल्या गेलेल्या दराने नुकसान भरपाई मिळते.

प्रश्न : ग्रामीण रोजगार हमीच्या निगडित तक्रारी कुठे केल्या जातात?

उत्तर : ग्रामीण रोजगार हमीचे काम, मजूरी, बेरोजगारी भत्ते, नुकसान भरपाई इत्यादीशी निगडित असलेल्या तक्रारी योजना अधिकारी यांच्याकडे केल्या जातात. योजना अधिकारी त्या तक्रारी नोंदवून घेतात, त्या तक्रारीवर ७ दिवसाच्या आत कारवाई होऊन संबंधीत अधिकाऱ्याकडे पाठविल्या जातात.

प्रश्न : ग्रामीण रोजगार हमीमध्ये कोणकोणत्या योजना चालविल्या जाऊ शकतात?

उत्तर : या अंतर्गत खालील प्रमाणे योजना चालविल्या जाऊ शकतात —

- गावांना रस्त्यांनी जोडणे
- सरोवर व तलावाची साफसफाई व दुरुस्ती करणे
- जमीन सुधारणेचे काम करणे.
- अनुसूचित जाती, वनवासी अगर भूमी सुधारणेसाठी फायदा मिळणाऱ्यांसाठी सिंचनाची व्यवस्था करणे. सिंचनासाठी कालवे बनवणे.
- झाडे लावणे अगर वनांचा विकास करणे.
- पाणी वाचवणे अगर पाण्याचा संरक्षण करण्याच्या योजना चालवणे

प्रश्न : ग्रामीण स्तरावर योजना कोण बनवतात?

उत्तर : राज्य सरकारद्वारा रोजगार योजनांच्या घोषणांच्या आधारे ग्रामपंचायत योजना बनवतात ते आपल्या क्षेत्रातील गावामधील केल्या जाऊ शकणाऱ्या कामांची योजना बनवतात, त्या बनवताना ग्रामसभा आणि वॉर्ड समिती यांचेसुध्दा मत घेतले जाते

प्रश्न : योजनांची स्वीकृती व बजेट कोठून मिळते?

उत्तर : ग्रामपंचायतद्वारा बनविण्यात येणाऱ्या योजनांची तपासणी व स्वीकृती योजना अधिकाऱ्याद्वारा केली जाते. विकास गट मधील सर्व ग्रामपंचायतीच्या स्वीकृत योजना जिल्हा पंचायतकडे पाठविल्या जातात. जिल्हा पंचायत सर्व योजनांचे बजेट स्वीकार करते.

प्रश्न : या कायद्यामध्ये ठेक्यावर काम करुन घेतले जाते काय?

उत्तर : या कायद्यामध्ये ठेका देऊन काम केले जाऊ शकत नाही.

प्रश्न : कामाच्या दरम्यान मशीनचा वापर केला जातो काय?

उत्तर : शक्यतो कामाच्या दरम्यान मशीनचा उपयोग करावयाचा नाही. फक्त गावकऱ्यांच्या शारिरीक श्रमाने योजना चालवावयाच्या आहेत.

प्रश्न : या अंतर्गत कोणती नवीन योजना केंव्हा चालू केली जाऊ शकते?

उत्तर : कमीत कमी ५० लोक मिळाल्यावर नवीन योजना चालू केली जाऊ शकते.

# ४. ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६

- कैलासने बाजारातून १ किलो मुगाची डाळ खरेदी करुन आणली. पॅकेटवर लावलेल्या लेबलवर डाळीचे वजन १ किलो लिहिले होते. त्याला वाटले की डाळ १ किलो नाही. घरी आल्यावर त्याने डाळ मोजून पाहिली तर ती ९५० ग्रॅम एवढी निघाली.
- राघवेंद्रने आपल्या परिवाराचे कपडे इस्त्री करण्यासाठी एक इस्त्री खरेदी केली. दुकानदाराने रु. ९०० घेऊन ती इस्त्री राघवेंद्र यास दिली. राघवेंद्र बील घ्यायचे विसरुन गेला. १० दिवसानंतर इस्त्री खराब झाली. राघवेंद्रने दुकानदाराकडे जाउन तक्रार केली असता दुकानदार म्हणाला, बील दाखवा. राघवेंद्र अवाक होऊन त्याचे तोंडाकडे पहातच राहिला. दुकानदार हसून बोलला "हे घ्या तुमचे बील." त्याने बील काढून दिले आणि म्हणाला ती इस्त्री तर ठिक होईल परंतू बाजारातून कोणतेही सामान खरेदी करताना त्याचे बील जरुर घ्या.
- आशिष याने एका मोठ्या दुकानातून टि.व्ही. खरेदी केला. तो घरी आणला. पूर्ण कुटुंब फार खुश होते. परंतू १२ दिवसानंतरच टि.व्ही खराब झाला. दुकानदाराकडे जाऊन त्याने तक्रार केली असता त्याने तो दुरुस्त करण्याठी २ महिने लागतील असे सांगितले. आशिषने आता काय करायचे?
- रमाशंकर मुलाचे औषध आणण्यासाठी औषधाच्या दुकानात गेला औषधाच्या बाटलीवर एम.आर पी. रु. ५३ असे लिहिलेले होते. परंतु दुकानदाराने ६० रु. मागितले. त्याबाबत विचारले असता दुकानदार म्हणाला "हे औषध फार कमी चालते." रमाशंकर म्हणाला की पावती द्याल, दुकानदाराने ते नाकारले.

अशा तऱ्हेची पुष्कळ उदाहरणे आहेत जी आपणांस आपल्या आजूबाजूला हल्ली दिसून येतात. अशा स्थितीमध्ये ग्राहकाचे संरक्षण करण्यासाठी कायदा मदत करतो आहे. या आपण माहित करुन घेऊ या ग्राहक संरक्षण अधिनियमामध्ये काय काय लिहिलेले आहे

प्रश्न : ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी कोणता कायदा बनविण्यात आला आहे?

उत्तर : भारतात सन १९९६ पूर्वी व्यापारी, उत्पादक यांची मनमानी आणि ग्राहकांचे शोषण यापासून वाचण्यासाठी कोणत्याही प्रकारचा कायदा अगर नियम नव्हते. वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा व वस्तूंच्या गुणांमध्ये कमतरता असताना ग्राहकांच्या हितासाठी कोणत्याही प्रकारच्या तक्रारी निपटण्यासाठी कोणताही अधिकार प्राप्त मंच उपलब्ध नव्हता. त्यामुळे ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ तयार करण्यात आला. त्यामध्ये ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्याच्या तरतूदी केल्या गेल्या आहेत.

प्रश्न : ग्राहक मंच काय आहे?

उत्तर : वरील कायद्यानुसार भारताच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक ग्राहक मंच, प्रत्येक राज्यामध्ये प्रादेशिक मंच तसेच राष्ट्रीय स्तरावर एक मंच यांची स्थापना केली गेली.

हा कायदा लागू झाल्यानंतर अतिशय कमी वेळेत व तातडीने ग्राहकांना न्याय देण्याची व्यवस्था केली गेली आहे. जेंव्हा व्यापाऱ्यांद्वारा विकल्या गेलेल्या मालामध्ये काही दोष असेल अथवा देण्यात आलेल्या सेवेमध्ये काही कमतरता अगर उपेक्षा असेल तेव्हा ग्राहक मंचासमोर जाऊन ती व्यक्ती आपले कथन करु शकते. तसेच व्यापारी इत्यादींच्या विरुध्द मदत मागू शकते. मंचाद्वारा दिल्या गेलेल्या आदेशांचे पालन करण्याबाबत देखील नियमांची व्यवस्था केली गेली आहे.

प्रश्न : ग्राहकांचे हिताकडे कोणत्या तऱ्हेने लक्ष दिले जाते?

उत्तर : जे सामान अगर सेवा ग्राहकाचे जीवन अगर संपत्तीसाठी हानीकारक आहे, ते विकण्यासाठी पूर्वदक्षता घेण्यासंबंधीचे निर्देश त्यामध्ये दिले गेले आहे. त्यामध्ये हे देखील सांगितले गेले आहे की, विकणाऱ्या मालाची प्रत, त्याची मात्रा, शुध्दता, मूल्य इत्यादी सांगितले जाईल. या कायद्याने अनुचित व्यापाराच्या प्रथेवर बंधन आले आहे. सामान किंवा सेवा घेणाऱ्या बऱ्याच लोकांना कायद्याची जाण नाही. आणि त्यामध्ये खालचा वर्ग व मध्यमवर्गाचे गरीब लोक आहेत. पुष्कळसे लोक अशिक्षीत देखील असतात परंतू त्यांच्या हिताची देखील काळजी या कायद्यामध्ये केली गेली आहे. सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने सर्वसामान्य लोकांसाठी हा कायदा बनविण्यात आलेला आहे.

प्रश्न : मंचाकडे तक्रार कशा रितीने केली जाते?

उत्तर ग्राहकांचा त्रास व व्यर्थ खर्चाची बचत व्हावी यासाठी या कायद्याच्या कारवाईमध्ये साक्षीपुरावा घेण्याची व्यवस्था केली गेलेली नाही. केवळ शपथपत्र व संबंधीत कागदपत्रांच्या आधारे ६ महिन्याच्या कालावधीमध्ये मंचाच्या प्रमुखास ते प्रकरण निकाली काढण्याचे निर्देश या कायद्यानुसार दिले गेले आहेत. या कायद्यानुसार पिडित ग्राहकाला वकिल देण्याची देखील आवश्यकता नाही. तो स्वत: आपली तक्रार लिहून किंवा लिहून घेऊन आवश्यक कागदपत्रांसोबत मंचासमोर दाखल करु शकतो.

प्रश्न : कोणकोणत्या सेवांसाठी मंचामध्ये जाता येऊ शकते.?

उत्तर : वस्तू अगर माल व्यापाऱ्याद्वारा विकला जातो. या कायद्यांअंतर्गत चल संपत्ती म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेता येण्या योग्य माल अथवा वस्तू तसेच सेवेच्या अंतर्गत बँकींग, बीमा, परिवहन, वीज, लॉजिंग, मनोरंजन, मनोविनोद, रेल्वे, पोस्टऑफिस, विमान, कुरिअर सेवा, स्वयंपाकाचा गॅस इत्यादी सेवा देखील अंतर्भूत आहेत. जर या सेवांमध्ये काही तरी कमतरता किंवा नुकसान ग्राहकास झाले तर त्याच्या नुकसान भरपाईसाठी या मंचामध्ये दाद मागता येते.

प्रश्न : कोणकोणत्या सेवा या कायद्याच्या अंतर्गत येत नाहीत?

उत्तर : सरकारी कर्मचारी आणि शासनाद्वारा जनतेस देण्यात येणाऱ्या सेवा या कायद्यांतर्गत येत नाहीत. तसेच सेवा जर नि:शुल्क अथवा व्यक्तिगत स्तरावर दिली गेली असेल

तर ती या कायद्याच्या कक्षेत येत नाही. जर ग्राहक गरीब असेल तर त्याच्या हितासाठी एक समिती स्थापन करण्याबाबतची व्यवस्था केली गेली आहे, ज्याद्वारे या मंचात ती व्यक्ती दावा दाखल करु शकते.

प्रश्न : तक्रारीचा निपटारा कशा प्रकारे होतो?

उत्तर : ग्राहकाद्वारा खरेदी केलेला माल अगर घेतलेली सेवा यामध्ये काही त्रुटी अगर कमतरता असेल तर त्या आधारावर मंचाकडे तक्रार दाखल केल्यावर विरोधी पक्षाला नोटीस पाठविली जाते. त्यांचे शपथपत्र व दस्ताऐवज दाखल झाल्यानंतर मंचाच्या प्रमुखाद्वारा तक्रारीचा निपटारा केला जातो. जर दोन्ही पक्ष किंवा उभय पक्षापैकी कोणताही एक पक्ष मंचाच्या आदेशावर असंतुष्ट असेल तर तो राज्य आयोगाकडे अपील करु शकतो. ग्राहकांच्या सेवेसाठी बनविलेल्या नियमामध्ये मंचापुढे करण्यात येणाऱ्या तक्रारीचा छापील विहित नमुना दिलेला आहे. या कायद्यामध्ये ग्राहकांच्या हिताचे रक्षण कशा प्रकारे केले आहे. यासाठी देण्यात येणाऱ्या सेवा अगर विकल्या गेलेल्या मालाची प्रत, मात्रा इत्यादीमध्ये कमतरता अगर चुका यामुळे खरेदीदारास झालेल्या नुकसानी संबंधी प्रकरणांचे काही नमुने पाहणे उचित असते.

प्रश्न : सामान खरेदी करताना ग्राहकाने कोणकोणत्या खबरदाऱ्या घ्यावयास हव्या?

उत्तर : जेव्हा ग्राहक काही सामान आपल्या घरासाठी खरेदी करण्यास जाईल तेंव्हा जी वस्तू खरेदी करावयाची आहे त्याची गुणवत्ता, मूल्य याची त्याने चौकशी करावयास हवी. उदा. : जसे ग्राहकाने सायकल खरेदी करण्यापूर्वी सायकल कोणत्या कंपनीची आहे कोणत्या दर्जाची आहे तिचे वास्तविक मूल्य काय आहे तसेच बाजारात इतर दुकानांमध्ये व या दुकानाच्या भावामध्ये फरक तर नाही याची तुलनात्मक पद्धतीने काही दुकानात जाऊन चौकशी केली पाहिजे. त्यानंतर सामानाची उपयोगिता त्याची प्रत, दर याबाबत समाधान झाल्यानंतरच त्या ग्राहकाने सायकल खरेदी केली पाहिजे.

प्रश्न : ग्राहक संरक्षण परिषद काय आहे?

उत्तर : केंद्र सरकारने केंद्रीय ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना केली आहे. या परिषदेचा अध्यक्ष ग्राहक खात्यासंबंधी मंत्री आहे. तसेच एका निर्धारित संख्येपर्यंत सरकारी व गैरसरकारी सदस्यांची नियुक्ती केली जाण्याची व्यवस्था त्यात आहे.

प्रश्न : ग्राहक संरक्षण परिषदचे उद्देश काय आहे?

उत्तर : ही परिषद स्थापन करण्याचा मुख्य उद्देश संपूर्ण भारतातील ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे हा आहे. ज्या वस्तूंच्या व्यापारांनी लोकांचे आरोग्य बिघडेल किंवा ते आजारी पडतील, त्यांच्या जीवनासाठी जे धोकादायक आहे. जसे की, सिगरेट किंवा दारुच्या बाटल्यांवर ही चेतावनी देणे आवश्यक आहे की, त्यांचा उपयोग आरोग्यासाठी धोकादायक आहे. या बाबी परिषद निश्चित करते. तसेच जनतेला माल खरेदी करणे तसेच सेवा घेण्याचे काय काय अधिकार आहेत या बाबत जागरुकता आणण्यासाठी

कार्यक्रम आयोजित करीत असते.

प्रश्न : राज्य ग्राहक संरक्षण परिषद काय आहे?

उत्तर : सर्व राज्यांमध्ये प्रत्येकी एक राज्य उपभोक्ता संरक्षण परिषदेची स्थापना केली गेलेली आहे. त्याचा अध्यक्ष राज्याचे ग्राहक खात्यासंबंधीचे मंत्री यांना बनविण्यात आले असून विभागीय आणि गैरविभागीय सदस्यांची निर्धारित संख्येमध्ये नियुक्ती केली गेली आहे. ग्राहकांच्या हितांचे अधिकाधिक रक्षण करण्यासाठी तिची स्थापना केली गेली आहे

प्रश्न : जिल्हा स्तरीय ग्राहक मंच काय आहे?

उत्तर : जिल्हा ग्राहक मंचामध्ये जिल्हा न्यायालय स्तरातील व्यक्तीस मंचाचा अध्यक्ष नियुक्त केले जाते. त्यांचे बरोबर दोन योग्य व्यक्ती ज्यांना कायद्याचे, अर्थशास्त्राचे, वाणिज्य, उद्योग, इत्यादी बाबतचे ज्ञान व अनुभव आहे अशा व्यक्तींना सदस्य म्हणून नियुक्त केले जाते. या दोन सदस्यांपैकी एक पद महिला सदस्यासाठी आरक्षित ठेवलेले आहे.

प्रश्न : जिल्हा मंचाचे काय अधिकार आहते?

उत्तर : जिल्हा मंचामध्ये असे प्रकरण चालविण्याचा अधिकार आहे की ज्यामध्ये माल अगर सेवा यामध्ये त्रुटी किंवा नुकसान झालेले आहे, व त्याच्या नुकसानभरपाईची रक्कम वीस लाखापेक्षा जास्त नाही.

प्रश्न : जिल्हा मंचामध्ये तक्रार दाखल करण्याची काय पद्धत आहे?

उत्तर : कोणीही ग्राहक खरेदी केलेला माल अगर प्राप्त केलेल्या सेवा या बाबतच्या नुकसान भरपाई साठी वरील मंचाकडे तक्रार दाखल करु शकतो. या तक्रारीसोबत तक्रारकर्त्यास त्याचे स्वत:चे शपथपत्र व संबंधित कागदपत्रे द्यावी लागतात. त्यानंतर ज्याचे विरुध्द तक्रार दाखल केली गेली त्यास मंचातर्फे नोटीस पाठविली जाते. त्यानंतर मंचाचे अध्यक्ष वादासंबंधी पक्षकारांचे म्हणणे ऐकतात. या प्रकरणात दाखल झालेली साक्ष, पुरावा व युक्तिवाद यांच्या आधारे ते आपला निर्णय पक्षकारांना देतात.

प्रश्न : या निकालावर अपील केले जाऊ शकते का?

उत्तर : जिल्हा मंचाने दोन्ही पक्षकारापैकी ज्याच्या विरुध्द निर्णय घोषित केला आहे तो पक्षकार जिल्हा मंचाच्या आदेशाची प्राप्ती झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत राज्य आयोगाकडे अपील दाखल करु शकतो.

अपील प्राप्त झाल्यानंतर राज्यमंच प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी विरुध्द पक्षाला सूचनापत्र पाठवून प्रकरणाचा जबाब देण्यासाठी व युक्तिवादासाठी हजर राहण्याचे निर्देश देते. ते प्रकरण दोन्ही पक्षकारांचे युक्तिवाद ऐकून व प्रकरणात आलेले दस्तऐवज व साक्षीपुरावे विचारात घेऊन त्याचा गुणदोषांवर राज्य मंच निकाल घोषित करते.

प्रश्न : राज्य मंचाच्या निकालाविरुध्द देखील अपील केले जाऊ शकते काय?


उत्तर : राज्य मंचाद्वारा दिल्या गेलेल्या आदेशाविरुध्द पिडित पक्षकार ३० दिवसाच्या कालावधी मध्ये नवी दिल्ली येथील राष्ट्रीय ग्राहक मंचामध्ये अपील दाखल करु शकतो. अपीलावर सुनावणी करण्यासाठी मंच विरुध्द बाजूला सूचनापत्र पाठवते. दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद ऐकून घेऊन त्यानंतर राष्ट्रीय मंच अंतिम आदेश घोषित करतो. राष्ट्रीय मंचाच्या आदेशाने पराभूत झालेला पक्ष, हवे असल्यास ३० दिवसाच्या आत सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील करु शकतो. ३० दिवसानंतर देखील अपील दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत प्रारंभिक चौकशीनंतर सर्वोच्च न्यायालय अपील दाखल करुन घेऊ शकते.

प्रश्न : या कायद्याअंतर्गत शिक्षेबाबत काय तरतुदी आहेत?

उत्तर : जिल्हा मंच, राज्यमंच व राष्ट्रीय मंचाद्वारा दिल्या गेलेल्या आदेशानंतर देखील संबंधित पक्ष जर त्याचे पालन करीत नसेल तर त्यास एक महिन्यापासून ते तीन वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा किंवा रु. २००० ते रु. १०,००० पर्यंत द्रव्यदंडाची शिक्षा होऊ शकते. शिक्षा व दंड दोन्ही देखील होऊ शकतात.

# ५. मोटार वाहन नुकसान भरपाई अधिनियम, १९३९

पूर्वी बैलगाडी, बग्गी, टांगे यातून प्रवास केला जात होता. हळूहळू त्यांचा वापर कमी होत गेला. त्यांची जागा भरवेगात चालणाऱ्या मोटारगाड्यांनी घेतली. पहिल्यापेक्षा कमी वेळामध्ये जास्त दूरचा प्रवास होऊ लागला. शहरी विकासाने गाव, खेडे आणि शहर यामधील अंतर आणखी कमी केले गेले. मोटार वाहनांच्या संख्येत देखील वाढ झाली त्याचा परिणाम म्हणून हजारो लोकांचे गावाकडून शहराकडे रोजचे येणे जाणे



सर्वसामान्य झाले. रोजच्या या धावपळीमध्ये दुर्घटना अधिक प्रमाणत होऊ लागल्या आहेत. अधिकतर लोकांना दुर्घटना झाल्यानंतर काय करावयाचे याची माहिती नसते. तेंव्हा आपल्या कडे मोटार अधिनियम १९३९ अंमलात आला. त्यानंतर मोटार वाहन अधिनियम १९८८ हा लागू करण्यात आला. सन १९९४ मध्ये त्यामध्ये दुरुस्ती केली गेली. त्याअंतर्गत अपघातातील पीडीत व्यक्तींसाठी काही महत्वपूर्ण तरतूदी करण्यात आल्या आहेत.

प्रश्न : या कायद्यानुसार मोटारवाहन कशाला मानले गेले?

उत्तर : 
- मोटारकार, ट्रक, बस, डंपर, जीप, ऑटोरिक्षा, स्कुटर, मोटारसायकल इत्यादींना मोटार वाहन मानले गेले आहे.
- जेव्हा ट्रॅक्टरचा वापर रस्त्यावर केला जातो तेव्हा यासही मोटार वाहन असे मानले जाते.
- ट्रॅक्टरचा उपयोग शेतामध्ये करतेवेळी त्यास मोटार वाहन मानले जात नाही. त्यावेळी एखादी दुर्घटना झाल्यावर कायद्यानुसार मोबदला मिळत नाही



प्रश्न : मोटारवाहनांमुळे दुर्घटना झाल्यास काय करावयास पाहिजे?

उत्तर : मोटार वाहन कायद्याच्या कलम १३४ नुसार कायदेशीर लिखापढी होण्याच्या आधी जखमी व्यक्तीचा इलाज होणे खूप जरुरीचे आहे. जखमीस तावडतोब जवळच्या इस्पितळामध्ये किंवा डॉक्टरांकडे घेऊन गेले पाहिजे. त्याचबरोबर पोलिस ठाण्यामध्ये प्रथम सूचना अहवाल (एफ.आय.आर.) दाखल करावयास पाहिजे.

प्रश्न : नुकसान भरपाई कशास म्हणतात?

उत्तर : मोटार दुर्घटनेमध्ये जखम झाल्यास, मृत्यू झाल्यास किंवा संपत्तीचे नुकसान झाल्यावर जी रक्कम मिळते तिल नुकसान भरपाई असे म्हणतात. ही दुसऱ्या पक्षाद्वारा पीडीत किंवा त्याचे कायदेशीर वारसास दिली जाते.

प्रश्न : मोबदला कोणत्या हिशोबाने दिला जातो?

उत्तर : मोबदल्याची रक्कम पीडित व्यक्तीचे वय, शारिरिक दुखापत, मानसिक दुखापत, उत्पन्न किंवा संपत्तीचे झालेले नुकसान यावरुन ठरविली जाते. मोबदल्याची रक्कम पिडित व्यक्तीच्या उत्पन्नावर देखील अवलंबून असते. अधिक उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीस अधिक नुकसान भरपाई मिळते

प्रश्न : दुर्घटनेत मृत्यू झाल्यावर त्याची नुकसानभरपाई कोणास मिळते?

उत्तर : मयत व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या कायदेशीर वारसांना नुकसानभरपाईची रक्कम मिळण्याचा अधिकार आहे. दुर्घटनेमध्ये पुरुषाचा मृत्यू झाल्यावर त्याचे आईवडिल, विधवा पत्नी किंवा त्याची मुले यांना नुकसान भरपाई मिळते.

महिलेचा मृत्यू झाल्यावर तिचा पती किंवा मुले यांना नुकसानभरपाई मिळते. मयत व्यक्तीवर अवलंबून असलेल्या इतर नातेवाईकांनासुध्दा कायदेशीर वारस मानले जाते. कमावती सज्ञान मुले, विवाहित मुली तसेच पुनर्विवाह करणारी विधवा यांना कायदेशीर वारस मानले जात नाही

प्रश्न : नुकसान भरपाई मिळण्यासाठी काय करावे लागते?

उत्तर : नुकसान भरपाई मिळण्यासाठी विशेष न्यायालय "मोटार अपघात प्राधिकरण" मध्ये खटला दाखल करावा लागतो. त्यामध्ये वाहन चालकाची असावधानता सिध्द करणे आवश्यक असते. अपघातामध्ये मृत्यू किंवा कायमस्वरुपी शारिरीक नुकसान झाले असेल तर चालकाचा बेजबाबदारपणा सिध्द करावा लागत नाही. तसेच अशा परिस्थितीत नुकसान भरपाईची एक ठराविक रक्कम अवश्य दिली जाते. अपघाताच्या नुकसान भरपाईसाठी स्थापन केलेल्या विशेष न्यायालयात दावा दाखल केला जातो. त्यास "मोटार अपघात प्राधिकरण" असे संबोधले जाते. ते जिल्हा न्यायालयामध्ये असते.

प्रश्न : नुकसान भरपाई कोण देते?



उत्तर :

- ज्याच्या चुकीमुळे दुर्घटना घडली त्याने नुकसान भरपाईची रक्कम द्यावयाची असते. वाहनाचा जर विमा काढलेला असेल तर विमा कंपनी नुकसान भरपाईची रक्कम अदा करेल.
- जर एखाद्याने आपले वाहन दुरुस्तीसाठी दिले आणि कारागीराने त्या गाडीने एखादी दुर्घटना केली तर नुकसान भरपाई गाडीच्या मालकासच चुकती करावी लागते.
- राज्य परिवहन बसला जर दुर्घटना झाली तर राज्यसरकारने नुकसान भरपाई द्यावयाची असते.
- खाजगी बस किंवा ट्रकने दुर्घटना झाल्यास त्याच्या मालकाने नुकसान भरपाईची रक्कम द्यावयाची असते.
- जर एखाद्याने वाहन दुसऱ्याकडून चालविले आणि त्या वाहनाने दुर्घटना झाल्यास त्या गाडी मालकाला नुकसान भरपाईची रक्कम द्यावी लागेल.
- एखाद्याने वाहन न मागता नेले व ते चालवताना दुर्घटना झाल्यास गाडी चालवणाऱ्याला नुकसान भरपाई द्यावी लागते

प्रश्न : दुर्घटनेमध्ये सहायक दोष कशाला म्हटले जाते?

उत्तर : दुर्घटनेमध्ये पीडीत व्यक्तीची असावधनता, चूक, हयगय यांना सहायक दोष म्हटले जाते :–

- पीडीत व्यक्ती जरी स्वत: वाहन चालवत असेल त्यावेळी त्याच्या वाहनाचे ब्रेक योग्य नसणे यास सहायक दोष म्हटले जाते.
- बसच्या टपावर बसून प्रवास करीत असताना दुर्घटना होऊन जखमी झाल्यास त्यास सहायक दोष मानला जाईल.
- वाहतुकीच्या सिग्नलकडे दुर्लक्ष करणे किंवा वाहन चुकीच्या दिशेने चालविणे

हे देखील या श्रेणीमध्ये येते. सहायक दोष असताना नुकसान भरपाईची रक्कम ही कमी होते.

प्रश्न : अनिवार्य नुकसान भरपाई कशाला म्हणतात?

उत्तर : मोटार दुर्घटनेमध्ये कायमस्वरुपी शारिरीक अपंगत्व किंवा मृत्यू झाल्यास एक ठराविक रक्कम नुकसान भरपाई म्हणून दिली जाते त्यास अनिवार्य नुकसान भरपाई संबोधले जाते.

प्रश्न : विनादोष दायित्व याचा काय अर्थ आहे?

उत्तर :

- जर कुणी एखाद्याची गाडी मागुन घेऊन चालविली. आणि त्यावेळी दुर्घटना झाली तर गाडी मालकाला नुकसान भरपाई द्यावी लागते. कुणाची तरी गाडी न मागता चालविली असता दुर्घटना झाल्यावर गाडी चालविणा—याला नुकसान भरपाई द्यावी लागेल.
- मोटार वाहन दुर्घटनेमध्ये होणारा मृत्यू किंवा कायमस्वरुपी अयोग्यततेसाठी मोटार वाहन अधिनियमामध्ये एक कमीत कमी रक्कम अनिवार्य मोबदल्याच्या स्वरुपात ठरविली गेली आहे.
- जर एखादी व्यक्ती दुसऱ्या कुणाचे वाहन मागवून घेऊन चालवित असेल आणि त्याने दुर्घटना झाल्यास गाडी मालकास नुकसान भरपाई द्यावी लागते. कुणाचे तरी वाहन न मागता चालविले व दुर्घटना झाल्यास गाडी चालविणाऱ्यास नुकसान भरपाई द्यावी लागेल. ती रक्कम मिळण्यासाठी वाहन चालकाची असावधानता सिध्द करण्याची आवश्यकता नसते. पीडित व्यक्तीचा देखील दोष पाहिला जात नाही. अशा नुकसान भरपाईची जी रक्कम दिली जाते तिला विनादोष दायित्व निभावणे असे म्हटले जाते

प्रश्न : विनादोष दायित्व अंतर्गत किती नुकसान भरपाई द्यावी लागते?

उत्तर : वाहन चालक किंवा वाहन मालकाद्वारा झालेल्या दुर्घटनेमध्ये एखादी व्यक्तीस स्थायी अयोग्यता आली असेल तर त्यास रु. २५,००० (पंचवीस हजार) एवढी रक्कम दिली जाते. पीडित व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसांना रु. ५०,००० (पन्नास हजार) नुकसान भरपाई दिली जाते

प्रश्न : स्थायी अयोग्यता कशाला म्हणतात?

उत्तर : दुर्घटनेमध्ये हात, पाय, बोटे तुटणे, डोळ्याची दृष्टी जाणे, बहिरा होणे, चेहरा किंवा डोके कुरुप होणे इत्यादींना स्थायी अयोग्यता असे म्हणतात

प्रश्न : दुर्घटना झाल्यावर चालकावर कोणता खटला चालविला जातो?

उत्तर : दुर्घटना झाल्यावर चालका विरुध्द फौजदारी स्वरुपाचा खटला चालविला जातो

प्रश्न : दुर्घटना संबंधी प्रकरणे लोकन्यायालयामध्ये मिटविले जातात का?

उत्तर : खटल्याच्या प्रदिर्घ प्रक्रियेमुळे काही राज्यांमध्ये कायम स्वरुपाच्या लोकन्यायालयाच्या माध्यमातून देखील दुर्घटनेसंबंधीच्या प्रकरणांचा निपटारा केला

जातो. त्यामध्ये दोन्ही पक्षांत आपसात तडजोड घडवून आणली जाते. लोकन्यायालयाची तारीख जाहीर झाल्यानंतर दाव्याचा क्रमांक विधी सेवा प्राधिकरणाकडे द्यावा लागतो

प्रश्न : नुकसान भरपाईसाठी कोण मागणी करु शकते?

उत्तर : खाली नमूद केलेल्या व्यक्ती नुकसान भरपाईसाठी मागणी करु शकतात –

- मोटार दुर्घटनेमध्ये जखमी झालेली व्यक्ती
- ज्याच्या संपत्तीचे नुकसान झाले आहे अशी व्यक्ती
- मोटार दुर्घटनेमध्ये मयत झालेल्या व्यक्तीचे कायदेशीर वारस
- जखमी व्यक्ती किंवा कायदेशीर वारसांचे प्रतिनिधी ज्यांना दाव्याचा अधिकार दिला गेला आहे अशा व्यक्ती

प्रश्न : नुकसान भरपाईच्या दाव्याच्या नमुन्यामध्ये काय–काय माहिती देणे जरुरी आहे.

उत्तर : नुकसान भरपाईच्या दाव्याच्या विहित नमुन्यामध्ये जखमी व्यक्तीचे नाव, त्याचे वय,व्यवसाय, उत्पन्न, दुर्घटनेची वेळ, तारीख, ठिकाण, पोलिस ठाण्याचे क्षेत्र, प्रथम सूचना अहवाल नं, वाहनाचे नाव व नंबर, चालक, मालक आणि वीमा कंपनी यांची नावे इत्यादी माहिती देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर कशा नऱ्हेच्या दुखापती झाल्यात व त्यांचा इलाज कोठे झाला तसेच मागण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईचे कारण देखील दाव्याच्या नमुन्यामध्ये लिहिणे जरुरी असते

प्रश्न : विशेष न्यायालय दाव्यावर काय कारवाई करते?

उत्तर : विशेष न्यायालय म्हणजे ''मोटार अपघात प्राधिकरण'' वाहन मालक आणि विमा कंपनी यांना नोटीस पाठवते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून नुकसान भरपाईची रक्कम ठरविली जाते. त्या निकालात हे स्पष्ट केले जाते पीडित व्यक्तीस नुकसान भरपाईची किती रक्कम चालक देईल, व किती रक्कम वीमा कंपनी किंवा मालक देईल,

प्रश्न : विशेष न्यायालयाच्या निकालानंतर काय कारवाई होते?

उत्तर : १५ दिवसाच्या आत निकालाची एक–एक प्रत सर्व पक्षकारांना पाठविली जाते. मोटार मालक किंवा वीमा कंपनी किंवा दोघांना ३० दिवसांमध्ये नुकसान भरपाईची रक्कम विशेष न्यायालयामध्ये जमा करावी लागते. न्यायालय ती रक्कम धनादेशाद्वारे पीडित किंवा त्याच्या वारसास देते. विशेष न्यायालयाच्या निकालावर असंतुष्ट असल्यास कोणत्याही पक्षाला ९० दिवसाच्या आत उच्च न्यायलयामध्ये अपील करता येईल

प्रश्न : दुर्घटना करुन जाणाऱ्याची जर ओळख पटू शकली नाही तर सरकार काय मदत करते?

उत्तर : बऱ्याच वेळा दुर्घटना करणारा वाहन चालक वाहन घेऊन पळून जातो. अशा दुर्घटनेला ठोस मारुन पळून जाणे (हिट अँड रन) असे संबोधले जाते. अशा प्रकारच्या अपघातांमध्ये वाहन व वाहन चालकाचे माहिती होणे कठीण असते. अशा

परिस्थितीत कोणालाही जबाबदार ठरवले जाऊ शकत नाही. यासाठी सरकार सांत्वनेच्या रुपामध्ये गंभीर जखम झालेल्या पीडीतास रु. १२,५०० (बारा हजार पाचशे) तसेच मृत्यू झाल्यावर मयताच्या कुटुंबास रु. २५,००० (पंचवीस हजार) मदत करते.

# ६. नरेगाच्या तक्रारीचे निराकरण

- ग्रामीण रोजगार हमी योजनेला स्वातंत्र्यानंतरची सर्वात महत्वपूर्ण योजना मानली जाते. ही योजना "कामाचे अधिकार" सुनिश्चित करुन प्रत्येक परिवाराला १०० दिवस काम देऊन ग्रामीण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करते.
- या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये जर कोठे काही गडबड दिसून आली तर त्याची तक्रार लेखी स्वरुपात लोकपाल यांचेकडे केली जाऊ शकते.
- प्रत्येक राज्याला एक लोकपाल कार्यालय स्थापीत करावे लागेल. लोकपाल आपले कार्य करण्यास स्वतंत्र राहील.
- लोकपाल यांना हा अधिकार देण्यात आला आहे की, ते नरेगा मजूरांच्या तक्रारी घेऊ शकतात.

<u>लोकपालाकडे तक्रार ज्या आधारावर केली जाते ते खालील प्रमाणे आहते :</u>

- ग्रामसभेची अनियमितता
- परिवाराचे नोंदणीकरण किंवा जॉब कार्ड
- कामाची मागणी
- कामासाठी केलेल्या अर्जाची पावती
- अदा केलेली मजुरी
- अदा केलेला बेरोजगार भत्ता
- लिंगाच्या आधारवर केलेला भेदभाव
- कार्यस्थळाच्या सुविधा
- केल्या गेलेल्या कामाचे मुल्यांकन
- दस्तऐवजांचे अवलोकन
- नरेगा रकमेचा वापर
- नरेगा राशीचे वाटप
- सामाजिक परिक्षण
- रेकॉर्डची अनियमितता

तक्रार निवारणाची क्रमबध्द प्रक्रिया अशा प्रकारे आहे —

लोकपालाद्वारे तक्रारीचे निराकरण करण्याची प्रक्रिया

लोकपाल

↓

तक्रार प्राप्त करणे

↓

तक्रार नरेगा अधिकाऱ्याकडे पाठविणे

↓

नरेगा अधिकारी या तक्रारीचे निवारण ७ दिवसाच्या आत करेल

↓

जर निवारण नरेगा अधिकाऱ्याकडून करण्यात आले नाही तर लोकपाल त्याचे निवारण करेल

↓

नरेगा अधिकाऱ्यास सूचना दिली जाईल

| ↓ | ↓ |
|---|---|
| घटनेचे स्वीकृत तथ्य<br>प्रकरणाचे निराकरण | घटनेचे अस्वीकृत तथ्य<br>लोकपालाद्वारा अॅवार्ड |

## आतापर्यंत आपण जाणले

"माहितीचा अधिकार" स्वातंत्र्यानंतर मिळालेला एक असा अधिकार आहे जो जनसमुदाय व सरकार यांच्यामध्ये एका सेतूचे काम करुन दोघांच्या नात्यांमध्ये पारदर्शकता आणतो. भ्रष्टाचार आणि शोषण यावर लगाम करण्यासाठी सुध्दा याचा भरपूर उपयोग होत आहे. सरकारी कार्याशी संबंधित कोणतीही माहिती निर्धारित शुल्क देऊन प्राप्त केली जाऊ शकते.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अधिनियम २००५ देखील एक असा कायदा आहे की, जो प्रत्येक गरीब कुटुंबाला वर्षामध्ये १०० दिवस काम देण्याची हमी देतो. ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ सर्व ग्राहकांना अधिकार देतो की, ज्या वस्तू अगर सामान ज्यांनी खरेदी केले आहे त्याची गुणवत्ता आणि मात्रा निर्धारित मापदंडानुसार अनुरुप असावी.

मोटार वाहन नुकसान भरपाई अधिनियम १९३९ आम्हास रस्त्यावर झालेल्या दुर्घटनेमुळे मिळणाऱ्या नुकसान भरपाईची माहिती तर देतोच त्याच बरोबर दोषींची शिक्षा निर्धारित करतो.

# महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in • ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६९५८६६ / (०२२) २२६९१३५८ • फॅक्स : (०२२) २२६७४२९५